दैनिक

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले | RNI No. MAHMAR/2019/82605 | वर्ष ७ वे | पाने ८ | मुल्य रू. ४.०० | अंक २३५ | सोमवार ८ जून २०२६

| पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 | www.rashtrasahyadri.com



'सहजयोग'

भाग ७५

## सहजयोग आणि कुंडलिनी...

हे सहज म्हणजे काय असतं? तुमच्यापैकी बऱ्याच जणांना हे ठाऊकही आहे. नानक साहेबांनी खूप मेहनत घेतली आहे आणि सहजावर खूप काही लिहिलं आहे. इथे तुमच्यावर त्यांची मोठी कृपा (वरदान) आहे. पण त्यांना कोणी ओळखत नाही, समजत नाही. 'सहज'चा अर्थ असतो स-ह-ज. 'सह' म्हणजे सोबत, 'ज' म्हणजे जन्माला आलेलं. जे तुमच्यासोबतच जन्माला आलं आहे. हा योगाचा अधिकार तुमच्यासोबतच जन्माला आला आहे. प्रत्येक मनुष्याला हा अधिकार आहे की त्याने हा योग प्राप्त करावा. पण तुम्ही माणूस असाल तरच! जर तुम्ही प्राणी झालात तर या अधिकारापासून वंचित राहाल, किंवा तुम्ही दानव झालात तरीही या अधिकारापासून वंचित राहाल. जर तुम्ही सर्वसामान्यपणे माणूस असाल, तर तुम्हाला अधिकार आहे की तुम्ही हा योग प्राप्त करावा. हाच एक योग आहे, बाकी कोणताही योग नाही. बाकी जेवढे काही योग आहेत, त्या याच्या केवळ तयाऱ्या आहेत. सहजयोगचा दुसरा अर्थ आपण असाही लावतो की, सहज म्हणजे सरळ, सोपं,प्रयत्नविरहित, उत्स्फूर्त, अचानक घडणारी गोष्ट, कारण ही एक जिवंत घटना आहे.तुम्ही सत्य शोधत आहात. मी मेहनत करायला तयार आहे आणि सर्व काही करायला तयार आहे. जो सत्यावर उभा राहतो, त्याचीच प्रतिष्ठा होते. परमात्मा अशा माणसावर कधीही प्रसन्न होऊ शकत नाही, जो स्वतःच्या बाबतीत एक आणि पाठीमागे दुसरीच गोष्ट करतो. ढोंगीपणा आणि या सगळ्या गोष्टी इथे चालणार नाहीत.या अटीवर आम्ही तुम्हाला पार (आत्मसाक्षात्कारी) करू आणि पुढे नेऊ. मुंबई, ३० जानेवारी १९७८ अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# इंडिया आघाडी मोदी सरकारला घेरणार

## देशभरातील २३ पक्षांची एकजूट : इंधन दरवाढ, महागाई, विद्यार्थ्यांचा आक्रोश केंद्रस्थानी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली : देशातील सद्यस्थिती आणि आगामी २०२९ च्या लोकसभा निवडणुकांच्या रणनीतीवर चर्चा करण्यासाठी, इंडिया आघाडीची एक महत्त्वाची बैठक आज सोमवारी (८ जून) राष्ट्रीय राजधानी नवी दिल्लीतील कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये होणार आहे. या महत्त्वपूर्ण बैठकीत विरोधी पक्षांची एकता मजबूत करणे आणि केंद्रातील मोदी सरकारविरोधात एक समान रणनीती आखण्यावर चर्चा होईल.**



या बैठकीला २३ राजकीय पक्षांचे ज्येष्ठ नेते उपस्थित राहणार आहेत. त्यात प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव, तृणमूल काँग्रेसच्या (टीएमसी) प्रमुख मम ता बॅनर्जी, राष्ट्रीय जनता दलाचे (आरजेडी) नेते तेजस्वी यादव, शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) प्रतिनिधी संजय राऊत आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार) प्रतिनिधी सुप्रिया सुळे यांचा समावेश आहे. मात्र, इंडिया आघाडीचा भाग असलेला एम. के. स्टॅलिन यांचा डीएमके पक्ष या बैठकीला उपस्थित राहणार नाही. सूत्रांनुसार, डीएमकेने सध्या या बैठकीपासू स्वतःला दूर ठेवले असून, उपस्थित न राहण्याचा निर्णय घेतला आहे.

**काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि खासदार जयराम रमेश यांनी बैठकीविषयी माहिती दिली. ते म्हणाले, इंडिया जनबंधन बैठकीत २३ राजकीय पक्षांनी आपला सहभाग निश्चित केला आहे. त्यांनी सांगितले की, काही पक्ष आपापल्या कारणांमुळे या विशेष बैठकीला उपस्थित राहू शकत नाहीत, परंतु ते सर्व मोदी सरकारच्या धोरणांना आणि कार्यपद्धतीला एकमताने विरोध करतात.**

जयराम रमेश यांनी आरोप केला की, केंद्र सरकारच्या धोरणांमुळे लाखो लोकांच्या मतदानाच्या हक्कांवर परिणाम होत आहे, संविधानावर सातत्याने हल्ला होत आहे आणि विरोधी नेत्यांना लक्ष्य करण्यासाठी तपास यंत्रणांचा वापर केला जात आहे. याव्यतिरिक्त, म हागाई, बेरोजगारी**(पान ४ वर)**

# नीट पेपर फुटीचे प्रकरण:

# शिक्षक मंत्र्यांचा राजीनामा घ्या, अन्यथा पंतप्रधानांनी जबाबदारी घ्यावी : दिपके

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संभाजीनगर :** प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणांमुळे देशातील एक कोटी विद्यार्थ्यांचे भवितव्य खराब झाले आहे. नीटच्या सहा-सात विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आहे, त्यांच्या आई-वडिलांना काय वाटत असेल? याची जबाबदारी कोणाची ? नीट प्रकरणानंतर अधिकाऱ्यांच्या केवळ बदल्या घडवून आणल्या. साधे निलंबनही करू शकत नसेल तर अशी व्यवस्था कुठपर्यंत चालणार, असा प्रश्न उपस्थित करून कॉक्रोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दीपके यांनी व्यवस्थेवरील आपला संताप व्यक्त केला. कोणावर तरी जबाबदारी निश्चित करावीच लागणार आहे, म्हणून धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा आम्ही मागत आहोत, अन्यथा पंतप्रधानांनी स्वत: जबाबदारी घ्यावी, अशी मागणीही त्यांनी रविवारी येथे केली.

### मुख्यमंत्र्यांचे विधान लाज वाटणारे

**फडणवीस यांनी दीपके यांच्या आंदोलनाबाबत अराजकतेशी संबंधित विधान केल्याचा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर अभिजीत म्हणाले, आंबेडकरांना मानतात ते लोक अराजकी असतात का ? जय भीमची घोषणा देणे अराजकता आहे, असे फडणवीस यांना म्हणायचे आहे का ? असा प्रश्न उपस्थित करून त्यांनी मुख्यमंत्र्यांचे विधान लाज वाटणारे आहे, अशा शब्दांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली.**



वाळूज येथील त्यांच्या निवासस्थानी घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना दीपके म्हणाले, जंतर-मंतरवरील तरुणांच्या प्रश्नांवरून छेडण्यात आलेल्या आमच्या आंदोलनाला अपेक्षेपेक्षा चांगला प्रतिसाद मिळत असून, धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा घेतल्याशिवाय आंदोलन थांबणार नाही. आजचा तरूण सरकारला घाबरत नसून, देशात आज प्रश्न विचारणारे, सरकारला आव्हान देणाऱ्यांना पाकिस्तानी ठरवले जात आहे. १७ वर्षाच्या वेदांतनेही सीबीएससीतील गुणघोटाळा बाहेर काढला तेव्हाही त्याला पाकिस्तानी ठरवण्यात आले, असे सांगून दीपके यांनी सरकारविरोधात बोलले की विद्यार्थी, विरोधक, पत्रकार, अशांना पाकिस्तानी ठरवण्याची नवी नीती अवलबंली जात आहे, असा आरोप करून तुम्ही कोणा-कोणाला पाकिस्तानी ठरवणार **(पान ४ वर)**

# कोल्हे कारखान्याची ३.८७ कोटीची कररक्कम परस्पर वळविली

- कर चलनांमध्ये फेरफार करुन अपहार
- माजी सहाय्यक राज्यकर आयुक्तांवर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर / कोपरगाव :** राज्य वस्तू व सेवाकर विभागाच्या संगणकीय प्रणालीतील करभरणा चलनांमध्ये कथितरीत्या अनधिकृत फेरफार करून शासनाच्या तब्बल तीन कोटी ८७ लाख ११ हजार ८५९ रुपयांच्या महसुलाला फटका दिल्याप्रकरणी तत्कालिन सहाय्यक राज्यकर आयुक्त प्रकाश लक्ष्मण चव्हाण (रा. गुलमोहर रस्ता, सावेडी) याच्याविरोधात भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात शुक्रवारी (५ जून) रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याला अद्याप अटक करण्यात आलेली नाही. राज्यकर उपआयुक्त हेमंत लक्ष्मण गांगे (वय ४३) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.

फिर्यादीनुसार, राज्य वस्तू व सेवाकर विभागातील करभरणा व्यवहार 'सेल्स टॅक्स ऑटोमेशन प्रोजेक्ट' (सॅप) या संगणकीय प्रणालीव्दारे केले जातात. व्यापार्यांनी भरलेल्या कराच्या चलनांवर संबंधित व्यापार्याचा टिन (करदाता ओळख क्रमांक) क्रमांक नोंदवलेला असतो. अशा चलनांमध्ये कोणतीही दुरूस्ती करण्यासाठी संबंधित व्यापार्याचा अर्ज आवश्यक असून त्यानंतरच अधिकार्यांना दुरूस्तीचे अधिकार असतात.

**या प्रकरणाची पुढील चौकशी सुरू असताना चव्हाण नावाच्या युजर आयडीचा वापर करून एकूण ४४ करचलनांमध्ये दुरूस्ती करण्यात आल्याचे महाविकास विभाग, मुंबई यांच्या निदर्शनास आले. या ४४ चलनांमधून एकूण तीन कोटी ८७ लाख ११ हजार ८५९ रुपयांची कररक्कम मूळ व्यापार्यांच्या खात्यावर न जाता इतर व्यापार्यांच्या टिन क्रमांकावर वर्ग झाल्याचे उघड झाले.**

दरम्यान, या प्रकरणाची सुरूवात सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना लिमिटेड यांनी भरलेल्या कराच्या काही रकमा इतर व्यापार्यांच्या टिन क्रम ांकावर वर्ग झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर झाली. या प्रकरणात एक कोटी रुपये, १० लाख रुपये, १५ लाख रुपये आणि १० लाख रुपये अशा रकमा मे. हॉटेल राजश्री (श्रीगोंदा), हॉटेल सिध्दांत (शिर्डी) आणि मे. कमला एंटरप्रायजेस (नाशिक) यांच्या टिन क्रमांकांवर वर्ग झाल्याचे आढळून आले होते. याबाबत तत्कालीन राज्यकर उपायुक्त संजय शिंदे यांनी वरिष्ठ कार्यालयाशी पत्रव्यवहार करून संबंधित रक्कम मूळ करदात्याच्या खात्यावर परत वर्ग करण्यासाठी पाठपुरावा केला होता. त्यानंतर **(पान ४ वर)**

## महत्वाचे..

### मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीत कलाकारांचा निरुत्साह

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीत तारकादळांचा निरुत्साह पाहायला मिळाला. प्रसिद्धीच्या झगमगाट वावरणारे कलाकार, दिग्दर्शक,निर्माते आदींनी आज मतदानाकडे पाठ फिरवली. तुलनेने, तंत्रज्ञ, पडद्यामागील कलाकार यांच्यात उत्साह दिसून आला. एकूण गोळाबेरीज पाहता ४९.९० टक्के इतके अल्प प्रमाणात मतदान झाले.उद्या सोमवारी मतमोजणी होणार आहे. दशकभरानंतर चित्रपट महामंडळाची निवडणुकीचा पडदा उघडला गेला. १७ जागांसाठी निवडणूक होत असताना ३ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. १४ जागांसाठी ४४ उमेदवारांमध्ये चुरशीची लढत होत आहे. मावळते अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांच्या नेतृत्वाखालील समर्थ पॅनल, सतीश रणदिवे यांच्या नेतृत्वाखालील चित्रकर्मी पॅनल आणि १६ अपक्ष उमेदवारांमुळे निवडणुकीचे चित्र अधिकच रंगतदार बनले होते. रविवारी मुंबई, पुणे आणि कोल्हापूर येथे मतदान झाले. सोमवारी सकाळी ९ वाजता राम गणेश गडकरी हॉल येथे मतमोजणी सुरू होणार आहे. तरी उमेदवारांनी सकाळी ८ वाजता त्या ठिकाणी हजर रहाणे आवश्यक आहे. या मतदान प्रक्रियेसाठी ७० अधिकारी-कर्मचारी सहभागी होते.

# कडगावात वादळी वाऱ्याने घर कोसळले: महिलेचा मृत्यू

## पाच ते सहा जण जखमी, शेतकरी कुटुंबाचे मोठे नुकसान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** पाथर्डी तालुक्यातील कडगाव येथे शुक्रवारी रात्री झालेल्या वादळी पाऊस व जोरदार वाऱ्यामुळे घराची पडझड होऊन एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. या दुर्घटनेत कुटुंबातील पाच ते सहा जण जखमी झाले आहेत. . घरासह संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कडगाव येथील शेतकरी विलास किसन शिरसाट यांच्या घरावर रात्री साडेनऊ ते पावणेदहा वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्याचा जोरदार फटका बसला. वीजांचा कडकडाट, मुसळधार पाऊस आणि वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे घरातील सर्व सदस्य पडवीत झोपले होते. त्याचवेळी



### वादळाचा एका क्षणात घात

**वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे शिरसाट कुटुंबीय पडवीत झोपले होते. अचानक आलेल्या प्रचंड वाऱ्याने घरावरील पत्रे उडाली आणि भिंत कोसळली. पत्र्याचा जबर मार समाबाई शिरसाट यांना लागल्याने त्यांचा जीव गेला. काही क्षणांतच संपूर्ण घराची पडझड होऊन कुटुंबावर मोठे संकट ओढवले.**

अचानक आलेल्या सुसाट वाऱ्याने घरावरील पत्रे उडून गेली. तसेच पत्र्यावरील भिंत कोसळल्याने पडवीत झोपलेल्या कुटुंबीयांवर ढिगारा पडला.या घटनेत घरावरील पत्र्याचा जबर मार समाबाई विलास शिरसाट यांना लागल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलविण्यात आले. मात्र **(पान ४ वर)**

# शेतात विष प्राशन; उपचारादरम्यान शेतकऱ्याचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** नेवासा तालुक्यातील झापवाडी (लोहगाव) येथील ४० वर्षीय शेतकऱ्याने शेतात विषारी औषध प्राशन केल्याने त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संदिप बद्रीनाथ काळे (वय ४०, रा.झापवाडी, लोहगाव) यांनी शनिवारी (दि.६ ) जून रोजी त्यांच्या स्वतःच्या शेतात अज्ञात विषारी औषध प्राशन केले. त्यानतर त्यांची प्रकृती गंभीर झाल्याने त्यांचे बंधू गणेश काळे यांनी त्यांना तातडीने उपचारासाठी अहिल्यानगर येथे खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. रुग्णालयात उपचार सुरू असतानाच रविवारी, (दि.७ ) जून रोजी दुपारी १२.४८ वाजता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. याबाबत अहिल्यानगर येथील रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी यांनी याबाबत सोनई पोलिसांना माहिती दिली.या घटनेची खबर संदिप बद्रीनाथ काळे यांच्या नातेवाईकांनी पोलिसांना दिली. त्यानुसार सोनई पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू रजिस्टर क्रमांक ३८/२०२६ अन्वये बीएनएसएस कलम १९४ प्रमाणे नोंद करण्यात आली.या प्रकरणाचा पुढील तपास स.पो.नि.अनिल मोरे यांच्या मार्गदर्शना खाली पो.हे.कॉ.एस.बी.चौधरी करत आहे.पोलीस तपासानंतर विषारी औषध प्राशनाचे नेमके कारण स्पष्ट होणार असून, घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# नेवाशाला वादळी पावसाचा तडाखा

## घरांची पडझड वाशीम येथे महिलेचा मृत्यू , केळी डाळिंब पिकांचे ही नुकसान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** अवघ्या पाच दिवसांच्या अंतराने नेवासा तालुक्याला वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा पुन्हा एकदा जबर फटका बसला आहे. शुक्रवारी सायंकाळी व रात्री झालेल्या भीषण वादळामुळे तालुक्यात मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली असून एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर दोघेजण जखमी झाले असून एका मोठ्या पशुधनाचाही मृत्यू झाला आहे. तालुक्यात अनेक ठिकाणी घरांचे, गोठ्यांचे आणि उभे पिकांचे नुकसान झाल्याची माहिती प्रशासकीय सूत्रांनी दिली.

वादळाच्या तीव्रतेमुळे तालुक्यातील वाशिम



**नेवासा तालुक्यात वादळी पावसामुळे फळ बागेचे झालेले नुकसान तर वाशीम येथे भिंत पडल्यामुळे महिलेचा मृत्यू झाला याचा पंचनामा करतांना पोलीस व प्रशासन अधिकारी दिसत आहे**

येथे मोठी दुर्घटना घडली. येथील रहिवासी छबूबाई श्रीधर शिंदे (वय अंदाजे ५६) यांच्या घरावरील पत्रे उडून भिंत अंगावर कोसळल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. वादळी पावसामुळे संदीप मच्छिंद्र पवार (वय ४०) व आशाबाई संदीप पवार (वय ३३) हे दोघेजण गंभीर जखमी झाले.

प्रशासनाच्या प्राथमिक अहवालानुसार, या नैसर्गिक आपत्तीमध्ये एका मोठ्या पशुधनाचा (दूधते/ओढकाम करणारे जनावर) मृत्यू झाला आहे. याशिवाय तालुक्यात एकूण १९ घरांचे नुकसान झाले असून, त्यामध्ये ९ कच्ची व १० पक्की घरे अंशतः किंवा पूर्णतः बाधित झाली आहेत. तसेच ५ जनावरांच्या वादळी पावसामुळे नेवासा तालुक्यात डाळींबा बागांचे मोठे नुकसान झाले.गोठ्यांचेही पत्रे उडून मोठे नुकसान झाल्याची नोंद महसूल विभागाने केली आहे. नेवासे शहरात रात्री ८ ते ९ वाजेदरम्यान वादळी वारे अतिशय रौद्र रूपाने वाहत होते. वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की, अनेक मुख्य रस्त्यांवर झाडांच्या मोठ्या फांद्या तुटून पडल्या. यामुळे शहरासह ग्रामीण भागातील वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला

आधीच्या वादळातून सावरत असलेल्या नेवासा येथील शेतकऱ्यांवर या नव्या संकटामुळे दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मागील वादळातून वाचलेला केळीच्या बागांचा उर्वरित भाग या वाऱ्याने पूर्णपणे जमीनदोस्त केला. डाळिंबाची फळगळ होऊन बागांचे मोठे नुकसान झाले आहे. **(पान ४ वर)**

# मतदार यादी शुद्धीकरण की मताधिकार हिरावण्याचा प्रयोग?

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

भारतीय लोकशाहीची खरी ताकद निवडणुकांमध्ये नसून त्या निवडणुकांमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक नागरिकाच्या मतदानाच्या अधिकारात आहे. मतदानाचा हक्क हा केवळ एक प्रशासकीय अधिकार नसून तो भारतीय संविधानाने दिलेला घटनात्मक अधिकार आहे. त्यामुळे मतदार यादी तयार करणे, तिचे पुनरावलोकन करणे किंवा अपात्र नावे वगळणे या प्रक्रिया अत्यंत पारदर्शक, विश्वासार्ह आणि न्याय्य असणे आवश्यक आहे. मात्र अलीकडील विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (एसआयआर) प्रक्रियेबाबत समोर आलेली आकडेवारी आणि न्यायालयीन निरीक्षणे या प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत आहेत.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२४ नुसार निवडणूक आयोगाला संसद व राज्य विधानमंडळांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, नियंत्रण आणि मतदार याद्या तयार करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. त्याचवेळी अनुच्छेद ३२६ सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराची हमी देतो. म्हणजेच पात्र असलेल्या प्रत्येक प्रौढ भारतीय नागरिकाचा मतदार यादीत समावेश होणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून संविधानाची अपेक्षा आहे. त्यामुळे मतदार यादीतून नाव वगळणे हा अपवाद असला पाहिजे, नियम नव्हे.

मतदार यादीतून एखादे नाव वगळण्यापूर्वी संबंधित व्यक्तीस कारणे दाखवा नोटीस देणे, त्याला आपली बाजू मांडण्याची संधी देणे आणि त्यानंतर कारणांसह लेखी आदेश देणे ही कायदेशीर प्रक्रिया आहे. या निर्णयाविरुद्ध अपील करण्याचा आणि न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार नागरिकाला आहे. म्हणजेच मतदार यादीतून वगळणे ही केवळ प्रशासकीय कारवाई नसून त्याचे थेट परिणाम नागरिकांच्या मूलभूत लोकशाही सहभागावर होतात.

सर्वोच्च न्यायालयाने 'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स विरुद्ध निवडणूक आयोग' या प्रकरणात दिलेल्या निरीक्षणांमधूनही ही बाब अधोरेखित झाली आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, नागरिकत्व आणि पात्रतेबाबत शंका असल्यास निवडणूक अधिकाऱ्यांनी मर्यादित चौकशी करू शकते; मात्र त्यासाठी कायदेशीर प्रक्रिया पाळणे बंधनकारक आहे. न्यायालयाने हेही स्पष्ट केले की अशा सर्व निर्णयांचे न्यायालयीन पुनर्विलोकन होऊ शकते.

बिहारमधील एसआयआर प्रक्रियेदरम्यान सुमारे ४७ लाख नावे मतदार यादीतून वगळण्यात आल्याचे समोर आले. म्हणजेच राज्यातील दर शंभर प्रौढ नागरिकांमागे साधारण सहा जण मतदानाच्या प्रक्रियेबाहेर फेकले गेले. ही संख्या स्वतःच चिंताजनक आहे. परंतु याहून अधिक गंभीर बाब म्हणजे पश्चिम बंगालमधील अनुभव. पश्चिम बंगालमध्ये एसआयआर प्रक्रियेनंतर वगळलेल्या नावांबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार न्यायिक पुनर्विलोकनाची व्यवस्था करण्यात आली होती. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार पहिल्या टप्प्यात मृत्यू, दुबार नोंदी, स्थलांतर किंवा अनुपस्थितीच्या कारणांवरून लाखो नावे वगळण्यात आली. त्यानंतर 'तार्किक विसंगती' या कारणाखाली आणखी लाखो नावे वगळली गेली. एकूण जवळपास ९१ लाख नावे यादीतून कमी करण्यात आली.

या निर्णयांविरुद्ध दाखल झालेल्या अपिलांपैकी सुनावणी झालेल्या प्रकरणांमध्ये तब्बल ६१.४३ टक्के अपिले ग्राह्य धरून नागरिकांची नावे पुन्हा मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली. हा आकडा अत्यंत धक्कादायक आहे. कारण याचा अर्थ असा की, न्यायिक तपासणीनंतर दहा पैकी सहा प्रकरणांमध्ये मतदार यादीतून वगळण्याचा निर्णय चुकीचा किंवा अपुरा ठरला.

याच निकषाचा बिहारमधील वगळलेल्या ४७ लाख नावांवर विचार केला तर सुमारे २९ लाख नागरिक पुन्हा मतदार यादीत समाविष्ट होण्यास पात्र ठरू शकतात, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. अर्थात हे गणित तंतोतंत लागू होईलच असे नाही; मात्र त्यातून एक मोठा प्रश्न उभा राहतोजर पुनर्विलोकनात इतक्या मोठ्या प्रमाणावर निर्णय बदलले जात असतील, तर मूळ छाननी प्रक्रिया किती अचूक आणि विश्वासार्ह होती?

निवडणूक आयोग ही देशातील सर्वात महत्त्वाच्या घटनात्मक संस्थांपैकी एक आहे. निवडणूक प्रक्रियेबद्दल जनतेचा विश्वास टिकवून ठेवण्याची जबाबदारी त्याच्यावर आहे. मतदार यादीतून लाखो नावे वगळली जाणे आणि नंतर त्यातील मोठा हिस्सा न्यायिक प्रक्रियेत योग्य ठरणे, ही परिस्थिती आयोगाच्या कार्यपद्धतीबद्दल गंभीर शंका निर्माण करते. मतदार यादी शुद्धीकरणाच्या नावाखाली पात्र नागरिक मतदानापासून वंचित राहत असतील, तर त्याचे परिणाम केवळ निवडणुकीपुरते मर्यादित राहत नाहीत; ते लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारे ठरतात. लोकशाहीची ताकद केवळ मतदानाच्या दिवशी दिसत नाही, तर प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाची संधी उपलब्ध करून देण्यात असते. त्यामुळे मतदार यादीतील त्रुटी दुरुस्त करणे आवश्यक असले तरी त्या प्रक्रियेत नागरिकांचे हक्क बाधित होणार नाहीत, याची हमी देणे अधिक महत्त्वाचे आहे. निवडणूक आयोगाने आपल्या प्रक्रियांमध्ये अधिक पारदर्शकता, जबाबदारी आणि उत्तरदायित्व आणणे ही काळाची गरज आहे. भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून ओळखली जाते. मात्र तिची खरी कसोटी निवडणुकीतील निकालांमध्ये नसून, प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाचा अधिकार प्रत्यक्षात मिळतो की नाही यामध्ये आहे. मतदार यादी शुद्धीकरणाच्या नावाखाली लाखो नागरिकांच्या मताधिकारावर प्रश्नचिन्ह निर्माण होत असेल, तर ती केवळ प्रशासकीय चूक नसून लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे.

# पर्यावरण दिनानिमित्त अमरनाथ ग्रुपच्या वतीने वृक्षांना पाणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा:** र्यावरण दिनानिमित्त नेवासा येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या मॉर्निंग वॉक अमरनाथ ग्रुपच्या वतीने देवगड रस्त्यावर लावलेल्या शेकडो वृक्षांना टँकरद्वरे पाणी पुरवठा करण्यात येऊन लावलेल्या वृक्षांना नवसंजीवनी देण्याचा उपक्रम अमरनाथ ग्रुपचे प्रमुख मार्गदर्शक नंदकुमार पाटील यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला.

सदर उपक्रमामध्ये नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व अमरनाथ ग्रुपचे मार्गदर्शक नंदकुमार पाटील,वृक्ष संवर्धन समितीचे व्यवस्थापक रामनाथ जाधव,रविंद्र जोशी,मेजर अरुण धनक,दिलीप जगदाळे, युनायटेड इन्शुरन्स कंपनीचे विकास अधिकारी किशोर गारुळे,व्यापारी शशिकांत नळकांडे,माजी नगरसेवक अंबादास ईरले,शंभूराजे जंगले, पत्रकार सुधीर चव्हाण,नगरसेवक जालिंदर गवळी, इंजिनिअर शंकर ओहोळ, व्यापारी राजेंद्र महाजन, मूर्तिकार बजरंग ईरले,ज्ञानेश्वर ऊगले,बँक मॅनेजर चंद्रकांत काटे,सुरेश शिंदे यांनी सहभाग नोंदवला.सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या अमरनाथ ग्रुपने वतीने खडका रस्त्यावरील देवगडकडे जाणाऱ्या रस्त्यावर विविध प्रकारची सुमारे दीडशे वृक्ष दोन वर्षांपूर्वी लावण्यात आलेली आहे,कडक उन्हाळयात देखील या वृक्षांचे संगोपन करण्याचे काम ग्रुपच्या वतीने करण्यात आले.वृक्षर संवर्धनाबरोबरच गोशाळेला शेड देणे,आरोग्य शिबिर,रक्तदान शिबिर,गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप,स्वच्छता अभियान असे समाजपयोगी उपक्रम अमरनाथ ग्रुपच्या वतीने राबविण्यात आले आहे. जळीत झालेल्या आपत्तीग्रस्त व्यावसायिकांना निधी देऊन हातभार लावण्याचा प्रयत्न केला आहे.झालेल्या वृक्ष संवर्धनासाठी जागतिक पर्यावरण दिनी राबविण्यात आलेल्या वृक्ष जलाभिषेक उपक्रमाचे अनेकांनी कौतुक करून अमरनाथ ग्रुपला धन्यवाद दिले.



# सामायिक बांधाच्या वादावरून बाप लेकाला मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** रस्ता काढुन सामाईक बांध तयार करीत असतांना आरोपींनी विरोध करून अजित पाटील व त्यांच्या वडिलांना शिवीगाळ करून लाकडी काठी व लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. ही घटना राहुरी तालुक्यातील माळेवाडी डुक्रेवाडी येथे दि. ३ जून रोजी दुपारच्या दरम्यान घडली.

अजित सुरेश पाटील, वय ३० वर्षे, रा. माळेवाडी डुक्रेवाडी, सात्रळ, ता. राहुरी, यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिरत दिली. त्या फिर्यादीत म्हटले आहे की, अजित पाटील यांच्या शेती जवळ बाळासाहेब शंकर डुकरे हे राहण्यास असुन दोघांनी त्यांच्या शेतीमध्ये जाण्याकरीता समंजसपणाने रस्ता ठेवलेला आहे. दि. ३ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास अजित पाटील व बाळासाहेब डुकरे हे त्यांच्या सामाईक रस्त्याची मोजणी करून घेवुन जेसीबी च्या सहाय्याने सदर रस्ता काढुन सामाईक बांध तयार करीत होते. तेव्हा आरोपी तेथे आले व त्यांनी जेसीबी बंद करण्यास सांगुन शिवीगाळ केली. तसेच तुम्ही रस्ता कसे काय काढता, असे म्हणुन दमदाटी केली. तेव्हा अजित पाटील यांनी समजावुन सांगितले की, सदर रस्ता हा आमच्या शेतातील सामाईक रस्ता आहे, तुमचा येथे काही एक संबंध नाही. असे म्हणाल्याचा राग आल्याने आरोपींनी अजित पाटील, त्यांचे वडिल तसेच भांडण सोडविण्यासाठी आलेल्या मित्रांना शिवीगाळ, दमदाटी करून लाकडी काठी व लाथा बूक्क्यांनी मारहाण केली.

अजित सुरेश पाटील यांच्या फिर्यादीवरून पोलिस ठाण्यात आरोपी अक्षय बापुसाहेब सिनारे, सत्यम राजेंद्र सिनारे, राजेंद्र गेणु सिनारे, महेश गोपीनाथ सिनारे, दत्तात्रय बाळासाहेब सिनारे, बाप्पुसाहेब गेणु सिनारे, सर्व रा. माळेवाडी डुक्रेवाडी, सात्रळ, ता. राहुरी, या सहा जणांवर गुन्हा रजि. नं. ६५६/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), ११८ (१), १८९ (२), १९०, १९१ (२), ३५१ (२), ३५२ प्रमाणे शिवीगाळ व मारहाण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# हनुमानवाडी शिवारात बिबट्याचे दर्शन

## नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई:** सोनई–कांगोणी रस्त्यालगत असलेल्या हनुमानवाडी शिवारातील येळवंडे वस्ती परिसरात पुन्हा एकदा बिबट्याचे दर्शन झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दोन महिन्यांपूर्वी बिबट्याच्या हल्ल्यात एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच पुन्हा बिबट्याचा वावर आढळल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

येळवंडे वस्तीवरील प्रगतशील शेतकरी जालिंदर पाटील येळवंडे यांनी त्यांच्या घराच्या पाठीमागील चारीजवळ बिबट्या उभा असल्याचे पाहिले. त्यानंतर परिसरातील नागरिकांना याबाबत माहिती देण्यात आली. येळवंडे यांच्या म्हणण्यानुसार, गेल्या काही दिवसांपासून रात्री तसेच पहाटेच्या सुमारास शेतात जाणाऱ्या अनेक नागरिकांना या भागात बिबट्याचे दर्शन होत आहे.

बिबट्याच्या सततच्या वावरामुळे शेतकऱ्यांमध्ये भीती निर्माण झाली असून शेतीची मशागत, पिकांना पाणी देणे तसेच इतर शेतीची कामे करण्यासाठी अनेक जण धजावत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे दैनंदिन नियोजन विस्कळीत झाले असून आर्थिक फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दोन महिन्यांपूर्वी याच परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात रंगनाथ शेटे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्यानंतर वनविभागाने बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावला होता. मात्र बिबट्याने पिंजऱ्याला हुलकावणी देत इतर भागात संचार सुरू ठेवला असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

मानवी जीवितास धोका निर्माण होण्यापूर्वी वनविभागाने सध्या लावलेला पिंजरा हटवून बिबट्याचा वारंवार वावर असलेल्या चारीलगतच्या ठिकाणी पिंजरा बसवावा, अशी मागणी जालिंदर पाटील येळवंडे यांनी केली आहे. तसेच परिसरातील नागरिकांनीही वनविभागाकडे पिंजऱ्याची जागा तातडीने बदलण्याची मागणी केली आहे.

# मक्तापुर येथे भगव्या ध्वजाचे पूजन करून शिवराज्याभिषेक सोहळा साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील मक्तापूर ग्रामपंचायत कार्यालयात भगव्या ध्वजाच्या पूजनाने शिवराज्याभिषेक सोहळा पार पडला यावेळी प्रगतशील शेतकरी अंबादास कांगुणे,मराठा सुकाणू समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी बोलतांना गणेश झगरे म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराजांनी वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षी स्वराज्य स्थापन करून स्त्रीयांवर होणारे अत्याचार थांबवण्याचे कार्य केले.त्यांच्या कारकीर्दीत एखाद्या महिलेवर अत्याचार केल्यास हात पाय तोडून न्याय मिळवून देत परस्त्री ही मातेसमान ते मानत,महिलांना आदराची वागणुक मिळत होती असे त्यांनी सांगितले

या रयतेच्या राजाच्या शिवराज्याभिषेक सोहळा कार्यक्रम प्रसंगी तंटामुक्त अध्यक्ष दत्ताभाऊ कांगुणे छबुराव बर्डे,ग्रामसेवक दत्तात्रय गर्जे,रामदास कांगुणे, अमोल भागवत,गोरक्षनाथ बर्डे, सुनील साळवे, तन्मय पांडागळे,आजिनाथ सुभाष बर्डे,राहुल जामदार,अजित झगरे,मनोज झगरे यांच्यासह मक्तापुर परिसरातील ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते



# रॉंग साइड एसटीमुळे वाहतूक कोंडी

## चालकावर राहुरी पोलिसांची कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव :** वाहतूक नियमांना धाब्यावर बसवत रॉंग साइडने बस चालवून वाहतूक कोंडी निर्माण करणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या बस चालकाविरुद्ध राहुरी पोलिसांनी कारवाई केली आहे. गणेश काशीनाथ कोळी (शिंदखेडा डेपो, जि. धुळे) असे संबंधित चालकाचे नाव असून, या घटनेमुळे एसटी महामंडळाच्या चालकांच्या शिस्तीबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

माहितीनुसार, संबंधित चालकाने बस रॉंग साइडने चालवत वाहतुकीचा खोळंबा केला. त्यामुळे रस्त्यावरील इतर वाहनचालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आणि काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. घटनेची दखल घेत राहुरी पोलिसांनी चालकाविरुद्ध नियमानुसार कारवाई केली.

विशेष म्हणजे, एसटी महामंडळाच्या काही चालकांकडून वारंवार वाहतूक नियमांचे उल्लंघन होत असल्याबाबत प्रशासन व संबंधित विभागांकडे अनेकदा पत्रव्यवहार करण्यात आला आहे. मात्र, त्यानंतरही चालकांच्या वर्तनात अपेक्षित सुधारणा झालेली दिसून येत नसल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे.

नागरिकांच्या मते, एसटी बससारखे सार्वजनिक वाहतुकीचे वाहन रॉंग साइडने जात असल्याचे पाहून इतर वाहनचालकांनाही तोच मार्ग योग्य असल्याचा गैरसमज होण्याची शक्यता असते. त्यामुळे अपघाताचा धोका वाढण्याबरोबरच वाहतुकीची शिस्तही बिघडते.

वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत जनतेला आवाहन करणाऱ्या यंत्रणांनी प्रथम स्वतःच्या वाहनचालकांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याची गरज असल्याची भावना या निमित्ताने व्यक्त होत आहे. संबंधित चालकावर झालेली कारवाई ही केवळ एक घटना न राहता, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत शिस्त आणि जबाबदारी निर्माण करण्यासाठी व्यापक उपाययोजनांची सुरुवात ठरावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.




# शेतकऱ्यांची कर्जमाफी फसवी

## शेतीमालाला हमीभाव द्या : रवींद्र मोरे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राज्य शासनाने जाहीर केलेली शेतकरी कर्जमाफी ही फसवी असून सर्व निकष बाजूला ठेवून सरसकट दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी करण्यात यावी, अशी मागणी शिवसेना शेतकरी सेनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रवींद्र (बापूसाहेब) मोरे यांनी केली. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसंदर्भात राहुरी तहसील प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

निवेदनात शेतकऱ्यांची थकीत वीजबिले माफ करणे, कृषी पंपांसाठी दिवसा किमान आठ तास वीजपुरवठा करणे, कांदा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देणे तसेच कांदा खरेदी फेडरेशनमार्फत प्रतिक्विंटल किमान २,५०० रुपये दराने कांदा खरेदी करावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. याशिवाय सर्व शेतीमालाला हमीभाव देऊन शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव मिळावा, अशीही मागणी करण्यात आली. सध्या कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून उत्पादन खर्च वाढत असतानाही बाजारात अपेक्षित दर मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत आला आहे. त्यामुळे शासनाने तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शासनाने मागण्यांवर तात्काळ सकारात्मक निर्णय न घेतल्यास ९ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात, नगर–मनमाड महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मोरे यांनी दिला.

यावेळी जिल्हाध्यक्ष राजेंद्र लांडे, बाळासाहेब जाधव, सचिन करपे, सुनील आढाव, सुनील इंगळे, अनिकेत कुलकर्णी, अमित पर्वत, शिवराज कडू, किशोर वराळे यांच्यासह शिवसेना व शेतकरी संघटनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# राम भक्त निखिल दहातोंडे याचे चांद्यात जल्लोषात स्वागत

## सायकलवर केला अठरा हजार कि.मी.चा प्रवास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चांदा :** नेवासा तालुक्यातील चांदा येथील निच्चिम राम भक्त म्हणून परिचित असलेले निखिल मच्छिंद्र दहातोंडे याचे १५ महिन्याच्या सायकल वारीत चार धाम बारा ज्योतिर्लिंग हा ४५७ दिवसाचा यशस्वी प्रवास करुन चांद्यात आगमन होताच फटाक्याच्या जल्लोषात स्वागत करण्यात आले.

चांदा येथून दि. ६ मार्च २०२५ रोजी निखिल दहातोंडे याच्या तिर्थक्षेत्राच्या प्रवासाला सायकल वरुन प्रारंभ झाला होता आणि चांदा ग्रामस्थांनी त्या वेळेस त्याच्या प्रवासाला शुभेच्छा दिल्या होत्या

आणि आज देखील चांदा येथील जवाहर मा . विद्यालया पासूनच फटाक्यांच्या आतिश बाजित त्याचे आगमन होताच जंगी स्वागत करण्यात आले व वाद्य वृंदाच्या गजरात मिरवणूकीस प्रारंभ झाला मानकोजी दहातोंडे स्वागत कमान, बस स्टँड मार्गे चांदा येथील बाजारतळावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे दर्शन घेऊन महाराजांची त्याच्या हस्ते महा आरती करण्यात आली

नंतर मेन व्यापारी पेठेतून हनुमान मंदिर, राम मंदिर, सोमेश्वर मंदिर, स्वामी समर्थ केंद्रात या सर्व देव देवतांचे दर्शन निखिल ने घेतले आणि नंतर या मिरवणूकीचा निखिलच्या निवासस्थानी समारोप झाला



निखिल दहातोंडे यांने सायकलवर चार धाम बारा ज्योतिर्लिंग हा प्रवास पूर्ण केल्या बद्दल त्याच्या जंगी स्वागत मिरवणूकीमध्ये हजारो ग्रामस्थ सहभागी झाले होते
**( छाया देविदास चौरे )**

तसेच ठिक ठिकाणी अनेक महिलांनी त्याचे औक्षण केले तर अनेकांनी निखिलचे शाल श्रीफळ पुष्पहार घालून स्वागत केले

जवळपास अठरा हजार किलो मीटरचा हा तिर्थ क्षेत्राचा प्रवास निखीलने सायकलवर यशस्वी केला त्यामुळे अनेकांनी त्याचे कौतुक केले चांदा गावातील सर्व समाजाचे नागरीक त्याच्या स्वागतासाठी उपस्थित होते .

नेवासा तालुक्यातील इतीहात भविष्यात निखिलची नोंद होईल असे कौतुकास्पद सायकलवर चार धाम बारा ज्योतिर्लिंग थिर्थ यात्रा निखिलने पुर्ण केली पुर्वी त्यांने सायकवरच अयोध्येला जाऊन प्रभू रामचंद्र यांचे दर्शन घेतले होते .

# सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षेत खंडाळ्याची 'अनन्या' चमकली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर :** रयत माऊलीच्या संस्कारांनी सुसंस्कृत झालेल्या खंडाळा येथील 'न्यू इंग्लिश स्कूल'च्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा रोवला गेला आहे. राज्यस्तरीय सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षेत विद्यालयाची गुणवंत विद्यार्थिनी अनन्या गणेश ढोकचौळे हिने तालुक्यात तृतीय क्रमांक पटकावून विद्यालयाच्या यशाची पताका अधिक उंच केली.

अनन्याच्या या दैदीप्यमान यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक मंगलदास बत्तीसे यांनी आनंद व्यक्त करताना सांगितले की, ''रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांच्या गतिमान व प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली विद्यालयात सातत्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जातात. हे यश म्हणजे विद्यार्थ्यांची कठोर मेहनत आणि विद्यालयातील गुरुजनांच्या सातत्यपूर्ण परिश्रमांचे सुवर्णफळ आहे.''

या यशामागे सरोज अहिरे, दत्तात्रय शिरसाठ, भाऊसाहेब लोंढे, सुनिल पवार, रामभाऊ जाधव, मुकेश देशमुख, रुपाली पवार, उषा रेपाळे, संगिता बर्डे, राहुल छल्लारे, कविता कोबरने, अशोक तिटकारे आणि शायदा बागवान या मार्गदर्शक शिक्षकांचे मोलाचे योगदान लाभले.

या यशाबद्दल संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने, भागवत ढोकचौळे, आबासाहेब ढोकचौळे, विजय चव्हाण आणि विद्यालयाच्या विविध समित्यांच्या पदाधिकाऱ्यांनी अनन्याचे व तिच्या पालकांचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द•ख•ल

## कोल्हार येथे ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास प्रारंभ



**कोल्हार** : अधिक मास (पुरुषोत्तम मास) निमित्त कोल्हार भगवतीपुर येथील ग्रामदैवत भगवती माता मंदिराच्या सभा मंडपात ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास प्रारंभ झाला असून हा पारायण सोहळा १२ जून पर्यंत चालणार असून या सप्ताह कालावधीत दररोज सकाळी सात ते बारा वाजेपर्यंत ज्ञानेश्वरी ग्रंथाचे वाचन होणार आहे. या ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यात महिला वाचक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत सोहळ्याचे व्यासपीठ चालक हभप विजय महाराज कुहिले हभप नामदेव महाराज शिरसागर व हभप अनिल लोखंडे हे आहे. शुक्रवारी पाच जून रोजी सकाळी कोल्हार बुद्रुक चे माजी सरपंच एडवोकेट सुरेंद्र खर्डे पाटील विजय महाराज कुहिले यांच्या उपस्थितीत आणि रावसाहेब कमलाजी खर्डे यांच्या धर्मपत्नी मथुरा खर्डे तसेच भरत सयाजी खर्डे यांच्या धर्मपत्नी मनीषा खर्डे या दांपत्याच्या हस्ते ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेसमोर कलश पूजन आणि ग्रंथ पूजन करून पारायण सोहळ्यास प्रारंभ झाला. शुक्रवार दि. १२ जून रोजी सकाळी दहा वाजता वरद विनायक सेवाधाम चे महंत उद्धव महाराज मंडलिक यांच्या काल्याच्या कीर्तनाने पारायण सोहळ्याची सांगता होणार आहे.

## लोकप्रतिनिधिनी पुणतांबा येथे संपर्क कार्यालय सुरु करण्याची मागणी

**पुणतांबा** : पुणतांब्यासह ११ गावासाठी शिर्डी व कोपरगाव मतदारसंघातील लोकप्रतिनिधींनी पुणतांबा येथे स्वतंत्र जनसंपर्क कार्यालये सुरु करावीत अशी मागणी पुणतांबा परिसरातील ग्रामस्थांकडून केली जात आहे. पुणतांब्यासह ११ गावे राहाता तालुक्यात आहेत. मात्र विधानसभेसाठी त्यांचा समावेश कोपरगाव मतदारसंघात आहे. गावाचे अनेक प्रश्न सध्या प्रलंबित आहेत. कोर्ट, कचेरीसह इतर कामे करण्यासाठी ग्रामस्थांना नेहमीच राहाता येथे जावे लागते. मात्र राहाता येथे जाण्यासाठी पुणतांबा येथून स्वंत त्र बससेवा नाही त्यामुळे ग्रामस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते अनेक लोकप्रतिनिधी कडेही असतात. त्यांना भेटणे सुध्दा शक्य होत नाही म्हणून पुणतांबा येथे खासदार नामदार व आमदार यांनी स्वंतत्र कार्यालये सुरू करण्याची नितांत गरज आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित येथील घाटांची व मंदिरांची दुरुस्ती करण्यासाठी सर्वच नेत्यांनी मोठ्या प्रमाणात निधी मिळून देण्यासाठी कंबर कसली आहे. अनेक लोकप्रतिनिधींनी पुणतांब्याशी संपर्क वाढविला आहे ही जमेची बाजू आहे. संपर्क आणखी वाढ विण्यासाठी संपर्क कार्यालयेच पुणतांबा येथे सुरू करण्याची मागणी पुणतांबा परिसरात जोर धरू लागली आहे.

# पर्यावरण रक्षण ही केवळ घोषणा नसून ती लोक चळवळ व्हावी : पद्मभूषण अण्णा हजारे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : पर्यावरण रक्षण ही केवळ घोषणा नसून ती लोक चळवळ व्हावी,या उद्देशाने निसर्ग व सामाजिक पर्यावरण मंडळाच्या सदस्यांनी काम करावे असे परखड मत पद्मभूषण डॉ अण्णा हजारे यांनी व्यक्त केले आहे. राळेगणसिद्धीत निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिन आणि वृक्षमित्र स्व. आबासाहेब मोरे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून केवळ विचारांचे मंथनच झाले नाही, तर पर्यावरण रक्षणासाठी एका मोठ्या संघटित शक्तीचा उदय झाला आहे. कार्यक्रमाच्या सांगता प्रसंगी ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांनी उपस्थित पर्यावरण प्रेमींना मार्गदर्शन केले.

निसर्गाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने वैयक्तिक स्तरावर पुढाकार घेणे किती गरजेचे आहे, हे त्यांनी आपल्या प्रबोधनातून अधोरेखित केले. त्यांच्या उपस्थितीने कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह



संचारला. कार्यक्रमाची सुरुवात अतिशय सकारात्मक पद्धतीने झाली. निर्मला म्हस्के यांनी स्वतःहून बहावा वृक्ष बियांचे वाटप करून एक निसर्गस्नेही संदेश दिला, तर यवतमाळच्या वैशाली राठोड यांनी कापडी पिशव्यांचे वाटप करत प्लास्टिकमुक्तीचा वस्तुनिष्ठ संदेश दिला. अशा उपक्रमांमुळे पर्यावरण दिनाचे औचित्य खऱ्या अर्थाने सार्थकी लागले. यावेळी सेवापूर्ती सन्मानामध्ये सेवानिवृत्त मुख्याध्यापक डॉ. अनिल किसन लोखंडे आणि राजेंद्र कांबळे यांचा विशेष गौरव करण्यात आला.

सोबतच राज्यभरातून आलेल्या नदी संवर्धन, वृक्षारोपण आणि प्राणीमित्र म्हणून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पर्यावरण प्रेमींचा मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षपद अहिल्यानगरच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी भूषवले. व्यासपीठावर माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती संध्या गायकवाड मॅडम, अति विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड आणि सेवानिवृत्त वनरक्षक प्रभाकर म्हस्के हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष प्रमोद मोरे यांनी केले.

यावेळी राज्यस्तरीय कोअर कमिटीने नियुक्त केलेल्या नूतन जिल्हाध्यक्षांना व राज्य कार्यकारीणी पदाधिकारी नियुक्ती पत्रे प्रदान करण्यात आली. छायाताई राजपूत यांनी कोअर कमिटीचा विशेष सन्मान केला. तसेच, प्रमोद मोरे आणि मीनाक्षी मोरे कुटुंबीयांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यशाळेचे सूत्रसंचालन गणेश शिंदे यांनी केले, तर आभार महेश पाडेकर (कार्याध्यक्ष) यांनी मानले. मंडळाचे सचिव वनश्री मोरे-गुणवरे, नानासाहेब गोफने, बाळासाहेब डोंगरे, चंद्रकांत भोजने, सुहास गावित, मदन राजपूत, प्रकाश केदारी, लतिका पवार आणि तुकाराम अडसूळ,भारती शेवते,गिताताई गिल्डा,स्वाती आहिरे,अलकाताई गव्हाणे,अनघा नांदापूरकर, सतिश नेहे,प्रा दादासाहेब जवरे, सोपानराव वायाळ, राजकुमार गिरी, संजय गायकवाड, वैभव मोरे, प्रा भारत उगाडे, सुर्यकांत बोईनवाड, शालिनी आंबरे,पत्रकार विजय बोडखे, विठ्ठल शिंदे, नामदेव जगदाळे ,अर्जुन राऊत, बाळासाहेब गाडेकर विनीत भोसले,यांच्यासह निसर्ग पर्यावरण मंडळाचे सर्व सदस्य अनेक प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत या सोहळ्याने राज्यातील पर्यावरण प्रेमींना एका सूत्रात बांधले आहे. या कार्यशाळेतून सुरू झालेली ही हरित चळवळ निश्चितच भविष्यात व्यापक स्वरूप घेईल, अशी भावना व्यक्त होत आहे.

## जिल्ह्यात शालेय वाहनांची विशेष तपासणी मोहीम राबविण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव** : अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थी वाहतुकीसंदर्भातील शासन नियमावलीची कठोर अंमलबजावणी करून विशेष तपासणी मोहीम राबविण्याची मागणी भाजप सोशल मीडिया सेलचे संयोजक पत्रकार संदीप आसने यांनी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.




विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर असून शालेय वाहनांबाबत शासनाने घालून दिलेल्या नियमांचे अनेक ठिकाणी काटेकोर पालन होत नसल्याचे निदर्शनास येत असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. राज्य शासन, परिवहन विभाग तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शालेय वाहनांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा, जीपीएस ट्रॅकिंग, अग्निशामक यंत्र, प्रथमोपचार पेटी, आपत्कालीन बाहेर पडण्याची व्यवस्था, महिला परिचारिका, चालक व परिचारकांची पोलीस पडताळणी, वैध परवाने, फिटनेस प्रमाणपत्र, विमा व इतर आवश्यक कागदपत्रे असणे बंधनकारक आहे. मात्र अनेक वाहनांमध्ये या नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याची बाब चिंताजनक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित तसेच खासगी शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या बस, व्हॅन, रिक्षा व इतर वाहनांची व्यापक तपासणी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच शाळांकडून आवश्यक माहिती मागवून त्याची पडताळणी करावी व नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शाळा किंवा वाहन चालकांवर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय जिल्हास्तरावर विशेष तपासणी पथके गठित करून शाळा सुरू होण्याच्या व सुटण्याच्या वेळेत प्रत्यक्ष तपासणी मोहीम राबवावी, तसेच मुख्याध्यापकांची जबाबदारी निश्चित करून शासन निर्देशांचे शंभर टक्के पालन करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विषय हा हजारो पालकांच्या विश्वासाशी निगडित असल्याने प्रशासनाने तातडीने प्रभावी कार्यवाही करून झालेल्या कारवाईचा अहवाल सार्वजनिक करावा, अशी अपेक्षा संदीप आसने यांनी व्यक्त केली आहे.

## श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर माऊली आश्रमाचा वर्धापन दिन साजरा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील पिचडगाव येथे हरी भक्त परायण श्री ज्ञानेश्वर महाराज हजारे यांनी स्थापित केलेल्या माऊली आश्रमातील श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचा पहिला वर्धापन दिन रविवारी महाप्रसाद वाटपाने व भजने गाऊन भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. पुरुषोत्तम मास पर्व काळात प्रथमच साजऱ्या झालेल्या माऊली आश्रमातील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराच्या प्रथम वर्धापनदिन सोहळया निमित्त श्रीराम साधना आश्रमाचे महंत सुनीलगिरी महाराज, त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत रमेशानंदगिरी महाराज, मध्यमेश्वर देवस्थानचे महंत बालयोगी ऋषिनाथ महाराज,देवगड संस्थानचे चोपदार बाळू महाराज कानडे, विजय महाराज पवार,लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, शशिकांत महाराज कोरेकर,गणेश महाराज तनपुरे यांच्या हस्ते माऊली आश्रमातील श्री संत ज्ञानेश्वर माऊलीच्या मंदिरातील मूर्तीचे पूजन करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील भजनी मंडळाच्या वतीने माऊली आश्रमातील मंदिरात पिचडगाव, मक्तापुर, म्हसले, बाभूळखेडे, गोंडेगाव, नजीक चिंचोली येथील भजनी मंडळाचा भजनांचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला.आलेल्या सर्व संत महंतांचे संतपूजन यावेळी माऊली आश्रमाचे प्रमुख हभप ज्ञानेश्वर महाराज हजारे यांच्या हस्ते करण्यात आले.

उपस्थित संत महंतांसह आलेल्या भाविकांनी अधिक पुरुषोत्तम मासाच्या निमित्ताने धोंडयानिमित्त आमरसाचे मिष्टान्न महाप्रसाद देण्यात आला. पिचडगाव पंचक्रोशीतील भाविकांमध्ये अध्यात्मिक ओढ लागावी म्हणून याठिकाणी माऊली आश्रमाची स्थापना राष्ट्र संत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने व सर्व भाविक भक्तांच्या योगदानातून करण्यात आली.

त्यानंतर संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराची निर्मिती करण्यात आली.या मंदिराला आज एक वर्ष पूर्ण होत असून सर्व संत महंतांच्या कृपाआशीर्वादाने माऊली आश्रमामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम राबविले जात असल्याने पारमार्थिक सुखाचा आनंद भाविकांना मिळत असल्याचे आश्रमाचे प्रमुख हभप ज्ञानेश्वर माऊली हजारे यांनी यावेळी बोलतांना सांगितले.

यावेळी झालेल्या माऊली आश्रम संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराच्या वर्धापनदिन सोहळयाच्या प्रसंगी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील व सिद्धांत नवले पाटील यांनी कार्यक्रमाला भेट दिली. कार्यक्रम प्रसंगी साहेबराव महाराज चावरे, गणेश महाराज शेजुळ, राजेंद्र महाराज आसने, बदाम महाराज पठाडे,श्रीधर महाराज अनुभुले, सरपंच पोपटराव हजारे,कल्याण महाराज पवार,देवगडचे सरपंच अजय साबळे,मक्तापूरचे पोलीस पाटील अनिलराव लहारे, बाभुळखेडा सरपंच ज्ञानेश्वर औताडे,वाकडीचे अंकुश काळे, राम महाराज खरवंडीकर सिताराम महाराज पठाडे,चेअरमन भगवानराव शेजुळ,उपसरपंच श्रीकांत बनसोडे सर्व ग्रामपंचायत आजी माजी सदस्य तंटामुक्तीचे अध्यक्ष यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतीपंपाचे अतिरिक्त भारनियमन रद्द करा ; जवरे

### ममदापूर -वाकडी सबस्टेशनला स्वतंत्र ३३ के.व्ही वाहिनी उभारण्यात यावेत ; मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राजुरी** : ऐन उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये विजेच्या तुटवड्यामुळे महावितरण कंपनीने शेतकऱ्यांच्या शेती पंपाला आठ तास दिला जाणारा विद्युत पुरवठा कमी करून सहा तास केल्यामुळे महावितरण कंपनीविरुद्ध तीव्र नाराजी व्यक्त केली.

यात,अतिरिक्त भारनियमाने कडाक्याच्या उन्हात शेतकऱ्यांचे पिके पाणी अभावी करपून जळून जात असल्याने शेतकऱ्यांकडे पाणी उपलब्ध असून विजे अभावी शेतकऱ्यांची आर्थिक नुकसान होत आहेत. ऊसासारखे पिके जळून चालेले आहेत. त्यामुळे महावितरणाने शेती पंपाला केले जाणारे अतिरिक्त भार नियमन तात्काळ रद्द करावे, अशी मागणी शेतकरी संघटनेचे जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजी जवरे यांनी महावितरण कंपनीचे अतिरिक्त उपकार्यकारी अभियंता भास्कर चव्हाण यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

राहाता तालुक्यातील बाभळेश्वर येथून ममदापूर, यादव मळा, वाकडी, या दोन सबस्टेशनला येणारी विद्युत वाहिनी एकच असल्याने ममदापूर,नांदूर, खंड ाळा,राजनखोल,उक्कलगाव,फत्याबाद, वाकडी, गणेशनगर, चितळी,जळगाव, धनगरवाडी,या गावांना औद्योगिक घरगुती व शेती पंपांना विद्युत पुरवठा केला जात असून ३३ केव्ही विद्युत वाहिनीचा भार २८५ एंपियरच्या पुढे गेल्यास शेतकऱ्यांना आठ तास ऐवजी सहा तास दिल्या जाणाऱ्या विद्युत पुरवठ्यात आणखी अतिरिक्त भारनियमन केले. या शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी ममदापूर,यादव मळा व वाकडी सब स्टेशनला स्वतंत्र ३३ केव्ही विद्युत वाहिनी उभारण्यात यावी, अशी मागणी जवरे यांनी केली.

महापारेषण बाभळेश्वर येथील उच्चदाब सबस्टेशन मधून यादवमळा महावितरण सबस्टेशनला येणारी ३३ के व्ही विद्युत वाहिनी ३० ते ४० वर्षापूर्वीची झाली असून वीज वाहक तारा पूर्णपणे जीर्ण झाल्या आहेत. त्यातच, यादवमळा सबस्टेशन मध्ये १० मेगावॅटचा बॅटरी चार्ज प्रकल्प सुरू होत असून,अगोदरच अतिरिक्त भारनियमनाची समस्या असताना त्यात बॅटरी चार्ज प्रकल्पासाठी आणखी विद्युत भार पाडल्यास सबस्टेशन मधील येथील आणखी वितरण व्यवस्था विस्कळीत होऊ शकते, त्यामुळे बाभळेश्वरवरून येणारी विद्युत वाहिनीच्या तारा बदलून नव्याने जास्त क्षमतेच्या टाकण्यात याव्या,अशी मागणी निवेदनात केली.

यावेळी, या निवेदनात शेतकरी संघटनेचे जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजी जवरे, राज्य सचिव रुपेंद्र काले, तालुकाध्यक्ष युवराज जगताप,अमोल मोढे, शरद पवार, बबनराव उघडे, राजेंद्र उंडे, राजेंद्र गोरे, शरद पठारे, किसन काकडे, बाळकृष्ण पठारे आदींच्या सह्या आहेत.

## शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचे पुन्हा गाजर

### शासन निर्णयाची होळी करून निषेध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राज्य शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत जाचक अटी घालून शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप करत शेतकरी संघटनेच्या वतीने देवळाली प्रवरा येथील छत्रपती चौकात शासन निर्णयाची होळी करून तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. संपूर्ण सातबारा कोरा करण्याची अपेक्षा असलेल्या शेतकऱ्यांचा या निर्णयामुळे भ्रमनिरास झाल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.



शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, २ जून २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या शासन निर्णयात १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीतील पीक कर्जासाठी कर्जमाफीची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या केवळ दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जालाच कर्जमाफी लागू करण्यात आली आहे. दोन लाखांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम स्वतः भरावी लागणार असल्याने मोठ्या संख्येने शेतकरी या योजनेपासून वंचित राहणार असल्याचा आरोप करण्यात आला.

मागील महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ चा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना नव्या योजनेत केवळ ५० हजार रुपयांपर्यंतच लाभ देण्याची अट घालण्यात आली आहे. लाखो रुपयांचे कर्ज असताना केवळ ५० हजार रुपयांची मर्यादा ठेवणे अन्यायकारक असल्याचे आंदोलनकर्त्यांनी म्हटले. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेल्या ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहनपर लाभासाठीही अनेक अटी घालण्यात आल्याने प्रामाणिक शेतकरीही लाभापासून दूर राहणार असल्याची टीका करण्यात आली. योजनेत आधार प्रमाणीकरण, ग्रीस्टॅक नोंदणी, उत्पन्न व इतर पात्रतेच्या अटींचा समावेश करण्यात आला असून त्यामुळे लाभार्थ्यांची संख्या मर्यादित राहील, असा दावा शेतकरी संघटनेने केला आहे.

यावेळी शेतकरी संघटनेचे युवा तालुकाध्यक्ष अमोल मोढे यांनी मनोगत व्यक्त करत या आंदोलनाची व्याप्ती राज्यभर वाढविण्यात येणार असल्याचे सांगितले. केंद्रीय अध्यक्ष रघुनाथदादा पाटील व उपाध्यक्ष अजितदादा काळे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी लढा अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

आंदोलनात जनुकाका शेटे, संजय काळे, साई सांगळे, प्रदीप सांगळे, सोन्याबापू मोरे, अरुण भांड, संदीप वाबळे, रितेश शिंदे, एकनाथ जंगले, वसंत थिटे, मच्छिंद्र भांड, दीपक सांगळे, बाळासाहेब शिंदे, ज्ञानदेव शेटे, सुधीर खांदे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# बालसंगोपनाच्या पैशाची प्रतीक्षा अखेर संपणार ?

## दीड लाख लेकरांसाठी १२० कोटींचा दिलासा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : वडील किंवा आई गमावलेली, काहींचे दोन्ही पालक नसलेली आणि अनेक संकटांशी झुंज देत शिक्षण घेणारी राज्यातील दीड लाखांहून अधिक मुले गेल्या अनेक महिन्यांपासून बालसंगोपन योजनेच्या अनुदानाची वाट पाहत आहेत.

त्यांच्या संगोपनाचा आणि शिक्षणाचा आधार ठरणाऱ्या या योजनेसाठी राज्य सरकारने आता २०२६-२७ या आर्थिक वर्षात पहिल्या टप्प्यात १२० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून त्यामुळे हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे. महिला व बालविकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या सुवर्ण महोत्सवी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेचा लाभ राज्यातील सुमारे दीड लाख बालकांना मिळतो.

या योजनेतून आई किंवा वडील गमावलेल्या तसेच अनाथ झालेल्या मुलांच्या शिक्षण आणि संगोपनासाठी दरमहा आर्थिक मदत दिली जाते. मात्र गेल्या काही महिन्यांपासून निधी वितरणात झालेल्या विलंबामुळे अनेक कुटुंबांची आर्थिक घडी विस्कटली होती. मिशन वात्सल्य शासकीय समितीचे सदस्य तथा महाराष्ट्र साऊ एकल महिला समितीचे राज्य समन्वयक मिलिंदकुमार साळवे यांनी सांगितले की, मागील आर्थिक वर्ष संपूनही अनेक लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदान जमा झालेले नाही. काहींना केवळ एप्रिल २०२५ महिन्याचा लाभ मिळाला असून उर्वरित निधी प्रलंबित आहे.

त्यामुळे शालेय साहित्य, फी, दैनंदिन खर्च आणि संगोपनासाठी अनेक पालकांना कर्ज किंवा उसनवारीचा आधार घ्यावा लागला. या निधीसाठी साऊ एकल महिला समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी, मिलिंदकुमार साळवे आणि राज्यभरातील कार्यकर्त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महिला व बालविकास विभाग तसेच आयुक्तालयाच्या स्तरावर वारंवार निवेदने देण्यात आली. अखेर अर्थसंकल्पातील तरतुदीतून १२० कोटी रुपयांचा पहिला हप्ता मंजूर झाला आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थी बालकांना दरमहा २२५० रुपये तर कोविड काळात पालक गमावलेल्या मुलांना केंद्र सरकारच्या पीएम केअर्स फॉर चिल्ड्रेन योजनेअंतर्गत ४ हजार रुपये प्रतिमहिना दिले जातात.

साळवे यांनी मात्र केवळ निधी मंजूर होणे पुरेसे नसल्याचे सांगितले. आर्थिक वर्षाच्या शेवटी एकरकमी निधी देण्याऐवजी लाभार्थी बालकांच्या खात्यात दरमहा नियमित रक्कम जमा झाली पाहिजे.

त्यामुळे त्यांच्या शिक्षण आणि संगोपनात खंड पडणार नाही, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. राज्यातील हजारो निराधार आणि वंचित मुलांसाठी ही योजना केवळ आर्थिक मदत नसून शिक्षण, स्वप्ने आणि भविष्य टिकवून ठेवणारा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे मंजूर झालेला हा निधी त्यांच्या आयुष्यात पुन्हा आशेचा किरण घेऊन येणार आहे.

## पान १ वरुन

### नेवाशाला वादळी पावसाचा तडाखा

ऊस पीकही मोडून पडले: वाऱ्याचा जोर इतका भीषण होता की, सहसा न वाकणारे आणि वाढीच्या अवस्थेत असलेले खंबीर ऊस पीकही अनेक शेतांमध्ये मोडून पडले आहे. संपूर्ण परिसर अंधारात बुडाला होता. अनेक घरांवरील छताचे पत्रे हवेत उडून दूरवर जाऊन पडले. महसूल व कृषी विभागाचे अधिकारी तातडीने अँक्शन मोडमध्ये आले आहेत. नुकसानग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी सुरू असून, शेतीपिकांच्या नुकसानीचे संयुक्त पंचनामे युद्धपातळीवर करण्याचे काम सुरू आहे.

### कडगावात वादळी वाऱ्याने घर कोसळले: महिलेचा मृत्यू

उपचारादरम्यान त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या दुर्घटनेत विलास शिरसाट, सागर शिरसाट, विराज शिरसाट, अलका शिरसाट यांच्यासह अन्य काही कुटुंबीय जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. वादळी वाऱ्यामुळे घराची पूर्ण पडझड झाली असून अनेक पत्रे वाऱ्याने उडून घरासमोर पडली. घरातील संसारोपयोगी साहित्याचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या दुर्घटनेमुळे शिरसाट कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण कुटुंब उघड्यावर आले आहे. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी मदतीसाठी धाव घेतली. पंचनामा व मदतकार्याची प्रक्रिया सुरू असून प्रशासनाने नुकसानग्रस्त कुटुंबाला तातडीची आर्थिक मदत देण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. दरम्यान तहसीलदार डॉ.उद्धव नाईक यांनी पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत.

### शिक्षक मंत्र्यांचा राजीनामा घ्या, अन्यथा पंतप्रधानांनी जबाबदारी घ्यावी : दिपके

आहात, असा प्रश्नही सरकारला विचारला. तरुण आणि त्यांच्या पालकांना आपले आवाहन आहे की तुम्ही घाबरू नका, जो पर्यंत तुम्ही प्रश्न विचारणार नाहीत तोपर्यंत व्यवस्था सुधारणार नाही, असेही ते म्हणाले. देशात दरवर्षी ५० लाख पदवीधर शिक्षण घेऊन बाहेर पडतात. त्यातील केवळ २० लाख विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळतात, इतर ३० लाख पदवीधर बेरोजगार राहतात. युवकांच्या प्रश्नाला घेऊन आम्ही पुढे जाणार आहोत. शांततेच्या मार्गाने आम्ही आंदोलन करणार आहोत. या आंदोलनाला अनेक विचारवंतांचा पाठिंबा, समर्थन मिळत आहे. सोनम वांगचूक, अंजली दमानिया, प्रशांत भूषण, विश्वंभर चौधरी, ॲड. संजय हेगडे आदींनी समर्थन दिले आहे. जे-जे युवकांच्या प्रश्नावर आम्हाला समर्थन देतील, त्यांचा पाठिंबा आम्ही घेऊ. आपल्यावर कुठलेही दडपण नसून, आपण युवकांचे प्रश्न आपली जबाबदारी मानतो आहोत. आपल्या संघटनेची विचारधारा महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जवाहरलाल नेहरू, भगतसिंग यांना मानणारी आहे, असे सांगून संघटनेची पुढील दिशा अनेकांशी चर्चा, विचारविनिमय करून निश्चित केली जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### इंडिया आघाडी मोदी सरकारला घेरणार

आणि आर्थिक आव्हानांनी सर्वसामान्य लोकांचे हाल अधिकच वाढवले आहेत, लाखो भारतीयांच्या उपजीविकेला गंभीर हानी पोहोचवली आहे, सततच्या महागाईमुळे कौटुंबिक बजेट विस्कळीत केले आहे, लाखो तरुणांच्या आशा-आकांक्षांचा विश्वासघात केला आहे आणि गुंतवणुकीचे वातावरण कमकुवत केले आहे. त्यांनी असेही म्हटले की, सरकारचे परराष्ट्र धोरण राष्ट्रीय हिताशी सुसंगत नाही आणि त्याचा गुंतवणुकीच्या वातावरणावर परिणाम झाला आहे. भारताप्रमाणेच, इंडिया जनबंधन आपल्या विविधतेमध्ये एकजूट आहे.

### कोल्हे कारखान्याची ३.८७ कोटीची कररक्कम परस्पर वळविली

राज्यकर विभागाने अंतर्गत चौकशी सुरू केली. सहाय्यक राज्यकर आयुक्तांकडून करण्यात आलेल्या तपासणीत या ४४ चलनदुरूस्तींसाठी आवश्यक असलेले व्यापार्यांचे अर्ज, संमतीपत्रे किंवा अन्य अधिकृत अभिलेख उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले. लाभार्थी व्यापार्यांकडे चौकशी केली असता त्यांनीही अशा प्रकारच्या चलनदुरूस्तींसाठी कोणतीही संमती दिल्याचे दस्तऐवज सादर करू शकले नाहीत. चौकशीदरम्यान आणखी एक धक्कादायक बाब समोर आली. मे. एस. एम. देशमुख पेट्रोलियम या व्यापार्याने भरलेली एक लाख ३० हजार ५०२ रुपयांची कररक्कम मे. हॉटेल नक्ष या व्यापार्याच्या टिन क्रमांकावर वर्ग करण्यात आली होती. तपासात हॉटेल नक्षचे मालक अक्षय प्रकाश चव्हाण हे प्रकाश चव्हाण याचा मुलगा असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे या व्यवहारावरही संशय व्यक्त करण्यात आला आहे.

राज्यकर सहआयुक्त कार्यालयाने ७ मे २०२६ रोजी जारी केलेल्या गोपनीय पत्रानुसार, प्रकाश चव्हाण याने १५ जुलै २०१७ ते ३० नोव्हेंबर २०२२ या कालावधीत अहिल्यानगर कार्यालयात कार्यरत असताना त्याच्या अधिकृत युजर आयडीचा वापर करून महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायदा २००२ अंतर्गत ४४ चलनांमध्ये व्यापार्यांचे अर्ज न घेता व नियमांचे पालन न करता दुरूस्त्या केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. प्रकाश चव्हाण याने आपल्या पदाचा गैरवापर करून, संगणकीय प्रणालीमध्ये हेतुपुरस्सर फेरफार करत शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसुलाचा अपहार केला.तसेच स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी आणि इतरांना लाभ मिळवून देण्यासाठी कररक्कम अनधिकृतपणे इतर व्यापार्यांच्या खात्यांवर वर्ग केली, असा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

# अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या हायवावर वैजापूर पोलिसांची कारवाई

## १५ लाखांचा मुद्देमाल जप्त; चालक फरार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

वैजापूर, तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीविरोधात वैजापूर पोलिसांनी धडक कारवाई करत एका हायवासह तीन ब्रास वाळू जप्त केली आहे. या कारवाईत एकूण १५ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, हायवाचा चालक अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून फरार झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ६ जून रोजी रात्री गस्तीवर असलेल्या पोलिस पथकाला भगगावकडून अवैधरित्या वाळू वाहतूक करणारा हायवा येत असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीची खातरजमा केल्यानंतर उपनिरीक्षक नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अंमलदार अमोल कांबळे, वाल्मीक बनगे व सहकाऱ्यांनी भगगाव रस्त्यावर सापळा रचला.

मध्यरात्रीच्या सुमारास संशयित हायवा आढळून आल्यानंतर पोलिसांनी वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र चालकाने वाहन न थांबवता काही अंतर पुढे नेले आणि रस्त्यातच सोडून अंधाराचा फायदा घेत पसार झाला. त्यानंतर पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता एमएच ५७ बी ०७५७ क्रमांकाच्या हायवामध्ये सुमारे तीन ब्रास वाळू आढळून आली. पोलिसांनी हायवा आणि वाळू असा एकूण १५ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोलिस अंमलदार अमोल कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वैजापूर पोलिस ठाण्यात संबंधित वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरोधात पोलिसांनी कारवाईची मोहीम सुरू ठेवली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.



## नाफेड व एनसीसीएफमार्फत हमीभावाने कांदा खरेदी सुरू होणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** कृषी उत्पन्न बाजार समितीसह राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये नाफेड व एनसीसीएफमार्फत हमीभावाने कांदा खरेदी सुरू करण्याची मागणी आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पणनमंत्री जयकुमार रावल यांच्यासह एन सी सी एफ व नाफेडकडे केली होती त्यास सकारात्मक प्रतिसाद देत या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय घेत हमीभावाने कांदा खरेदीस मान्यता दिली असून याबद्दल आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहे.

महाराष्ट्र राज्यात कांद्याच्या बाजारभावात झालेल्या घसरणीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. उत्पादन खर्च वाढत असताना मिळणारा कमी दर शेतकऱ्यांसाठी चिंतेचा विषय बनला होता. या पार्श्वभूमीवर आमदार विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे नाफेड व एनसीसीएफमार्फत कांदा खरेदी तातडीने सुरू करण्याची मागणी केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून संबंधित यंत्रणांना आवश्यक निर्देश दिल्यानंतर हमीभावाने कांदा खरेदीची प्रक्रिया सुरू झाली आहे. नाफेड आणि एनसीसीएफची कांदा खरेदी कृषी उत्पन्न बाजार समितीमधून होणार आहे. नाफेड व एनसीसीएफकडून बाजार समिती आवारातील खरेदीसाठीचे बाजार शुल्क माफ होणार असून सरकारी कांदा खरेदीसाठी असलेल्या जाचक अटी आणि शर्तींमध्ये सुधारणा झाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.त्यामुळे बाजारभाव स्थिर राहण्यास मदत होणार असून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य दर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.या निर्णयामुळे राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून आमदार विवेक कोल्हे यांच्या पाठपुराव्याला यश आल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.

## लहानग्यांच्या डोळ्यांत उजेड

### भट्टड हॉस्पिटलच्या नेत्र तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** :दौंड येथील भट्टड हॉस्पिटल व मॅगो इंटरनॅशनल प्री स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने ३ ते १० वयोगटातील मुलांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला पालक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.शिबिरामध्ये तब्बल ७५ मुलांची नेत्र तपासणी करण्यात आली. यावेळी दौंड येथील सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. चिराग भट्टड यांनी मुलांच्या डोळ्यांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन करताना सांगितले, हे सुंदर जग अनुभवण्यासाठी डोळा हा अत्यंत महत्त्वाचा अवयव आहे. मुलांच्या प्रत्येक हालचालीकडे पालक लक्ष देतात; मात्र त्यांची दृष्टी शंभर टक्के कार्यरत आहे का, हे बालपणीच ओळखणे गरजेचे आहे. त्यासाठीच या शिबिराचे आयोजन करण्यात आले.तपासणीदरम्यान सुमारे ३० मुलांना चष्म्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले. तसेच काही मुलांना रेटिना तपासणीची गरज असून, त्यांच्यासाठी पुढील मोफत तपासणी भट्टड हॉस्पिटल येथे करण्यात येणार असल्याची माहितीही डॉ. भट्टड यांनी दिली.

**दौंड येथील सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रेमकुमार भट्टड यांनी वैद्यकीय सेवेसोबत सामाजिक बांधिलकी जपत नेत्रदान चळवळ, मोफत नेत्र तपासणी शिबिरे तसेच पंढरपूर वारीतील वारकऱ्यांची मोफत तपासणी यांसारखी अनेक उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत डॉ. चिराग भट्टड यांनीही सामाजिक सेवेचा वारसा पुढे चालविल्याने सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.**

## स्व. गोविंदराव आदिक यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान:** येथील ग्रामपंचायत मधील मा. खा. गोविंदराव आदिक सभागृह मध्ये श्रीरामपूर तालुक्याचे भाग्यविधाते व टाकळीभान येथील गोविंद सागर (टेल टँक)चे जनक माजी मंत्री स्व. गोविंदराव आदिक यांना ११ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रवादी किसान सभेचे उत्तर नगर जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोकणे, मा. प्राचार्य जयकर मगर, देविदास कोकणे, माजी उपसरपंच भारत भवार, माजी चेअरमन एकनाथ पटारे, भाऊसाहेब पटारे,सुभाष पटारे, काकासाहेब डिके, मा. ग्राम. सदस्य सुनील त्रिभुवन,ग्रामपंचायत कर्मचारी अशोक तुपे, सुनील रणनवरे व ग्रामस्थ उपस्थित होते.




## संगमनेरला ९८ रुग्णांना १ कोटीं मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थ सहाय्य

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : विधानसभा मतदार संघातील सर्वसामान्य, गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना उपचारा साठी आर्थिक मदतीचा मोठादिलासा मिळावा म्हणून आ. अमोल खताळ यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्या मुळे मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षा च्या माध्यमातून मागील एका वर्षात ९८रुग्णांना तब्बल १ कोटी रूपयांचे वर वैद्यकीय अर्थसहाय्य मंजूर झाले आहे. त्यामुळे सर्वसामान्य रूग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.



अत्यंत खर्चिक व गंभीर आजारां वरील उपचारांसाठी मदत मिळाली त्यामुळे अनेक कुटुंबांना आर्थिक आधार मिळाला आहे. कर्करोग शस्त्र क्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायलिसिस, कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन), गुडघ्याचे प्रत्यारोपण, नवजात शिशुंचे आजार, रस्ते अपघात तसेच इतर गंभीर आजारां साठी उपचारांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या योजनांची माहिती नसते किंवा आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यात अनेक अडचणी येतात. अशा वेळी आमदार अमोल खताळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात सर्व प्रक्रिया वेगाने पूर्ण करून दिली जात आहे. यामुळे रुग्णांना वेळेत उपचार घेणे शक्य झाले आहे.उपचाराअभावी कोणत्याही रुग्णाला त्रास सहन करावा लागू नये, यासाठी शासना मार्फत महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना, आयुष्यमान भारत, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम किंवा धर्मादाय रुग्णालयांच्या योजनांचा लाभ नागरिकांना उपलब्ध करून दिला जात आहे. सर्व शासकीय योजनांचा लाभ जास्तीत जास्त गरजूवंतापर्यंत पोहोचावा, या वर आमदार अमोल खताळ यांच्या सूचनेनुसार विशेष भर देण्यात येत आहे.

## निधन वार्ता

### शोभा फासाटे



**श्रीरामपूर,** : शहरातील शोभा कैलास फासाटे (वय ४५) यांचे खंडाळा, ता. श्रीरामपूर येथे झालेल्या अपघातात निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात सासु, सासरे, पती, २ मुले, दीर व पुतणे असा परिवार आहे. त्या बबनराव मुरलीधर फासाटे यांच्या सून व पेटींग कॉन्ट्रॅक्टर कैलास फासाटे यांच्या पत्नी, योग प्रशिक्षक सौरभ व सार्थक फासाटे यांच्या त्या मातोश्री तसेच संजय फासाटे यांच्या त्या भावजयी होत.

### विनोद गिरमे



**श्रीरामपूर :** तालुक्यातील भोकर येथील गिरमे वस्ती येथे वास्तव्यास असलेले प्रगतशील शेतकरी विनोद दत्तात्रय गिरमे (वय ७२) यांचे शनिवार, दि. ६ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ भाऊ, १ मुलगा, २ मुली, सुन, पुतणे, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ते सुभाष गिरमे यांचे धाकटे बंधु, दिगंबर गिरमे यांचे वडील तर संचित गिरमे यांचे ते चुलते होते.

### कौशल्याबाई गोफणे



**श्रीरामपूर:** तालुक्यातील पढेगाव येथील कौशल्याबाई मुरलीधर गोफणे( वय १०६वर्षे)यांचे शुक्रवार दि. ०५ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात ४मुले,४मुली सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### लिला होले



**श्रीरामपूर,** : शहराच्या नजीक असलेल्या भैरवनाथनगर येथे गोंधवणी ते शिरसगांव रोडवर वास्तव्यास असलेल्या लिला सोपान होले (वय ८७) या जेष्ठ महिलेचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात ५ भाऊ, ३ बहिणी, भावजया, मेव्हुणे असा परिवार आहे. त्या सावता प्रतिष्ठानचे अध्यक्ष व श्री इम्पेक्सचे संचालक विजयराव कुदळे (आण्णा), नामदेव कुदळे, तुकाराम कुदळे, बाळासाहेब कुदळे, प्रकाश कुदळे, सुमन सोपान होले, विमल संभाजी पैठणकर, मंगल नामदेव जगताप यांच्या भगिनी होत.

## अतुल रासकर यांची युवा मोर्चाच्या जिल्हा संयोजकपदी नियुक्ती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या छत्रपती संभाजीनगर (पश्चिम) संघटनात्मक जिल्ह्यातील डखठ - युवा मोर्चा जिल्हा संयोजक पदावर अतुल रासकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांच्या मान्यतेने ही नियुक्ती करण्यात आली असून, याबाबतचे नियुक्तीपत्र युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमोल जाधव यांनी प्रदान केले आहे. नियुक्तीपत्रात नमूद केल्याप्रमाणे,भारतीय जनता पार्टीची ध्येय-धोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे, पक्ष संघटना अधिक बळकट करणे आणि युवकांमध्ये पक्षाची विचारधारा रुजविण्यासाठी अतुल रासकर प्रयत्नशील राहतील, असा विश्वास पक्ष नेतृत्वाने व्यक्त केला आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष अमोल जाधव,वैजापूर नगरपरिषद चे नगराध्यक्ष दिनेश परदेशी, जि. प. बांधकाम सभापती सचिन गरड,भाजपा तालुका अध्यक्ष रवींद्र चव्हाण, भाजपचे दशरथ बनकर आदी उपस्थित होते.जगातील सर्वात मोठ्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्याबद्दल पक्षाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.त्यांच्या नियुक्तीबद्दल भाजप कार्यकर्ते,पदाधिकारी व विविध स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



# शिवतीर्थावर उसळला शिवभक्तांचा महासागर

## धानोरे घाटावर शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त धनेश्वर देवस्थान, धानोरे घाट येथील शिवतीर्थावर शनिवारी हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात सोहळा पार पडला. भगव्या पताकांनी सजलेला परिसर, ''जय भवानी-जय शिवाजी''च्या गगनभेदी घोषणा आणि शिवरायांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी जमलेल्या शिवप्रेमींमुळे संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. सोहळ्याची सुरुवात विलास इंद्रभान शिंदे आणि बाबासाहेब पाराजी दिघे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेच्या विधिवत अभिषेकाने झाली. दिवसभर भाविकांनी शिवतीर्थावर दर्शन घेत महाराजांना अभिवादन केले. युवक, महिला आणि शिवभक्तांचा उत्स्फूर्त सहभाग कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरला. सायंकाळी महाआरतीनंतर झालेल्या भव्य आतषबाजीने वातावरण भारावून गेले. ''जय शिवराय''च्या घोषणांनी धानोरे घाट परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते शिवव्याख्याते प्रा. एस. झेड. देशमुख यांचे प्रेरणादायी व्याख्यान. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राष्ट्रनिर्मितीच्या कार्याचा आढावा घेत स्वराज्याची संकल्पना, लोककल्याणकारी शासनव्यवस्था, सामाजिक समता आणि आजच्या तरुणांची जबाबदारी यावर सखोल मार्गदर्शन केले. ''शिवाजी महाराज हे संपूर्ण राष्ट्राचे प्रेरणास्थान असून त्यांचे विचार आजच्या पिढीने आचरणात आणणे गरजेचे आहे,'' असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या समारोपानंतर आयोजित आमटी-भाकरीच्या महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. श्री क्षेत्र धनेश्वर देवस्थान ट्रस्ट, शिवतीर्थ व्यवस्थापन समिती, युवक मंडळे आणि ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे संपूर्ण सोहळा शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. रायगडावरील शिवराज्याभिषेकाच्या ऐतिहासिक स्मृतींना उजाळा देणारा हा सोहळा स्वराज्य, संस्कृती आणि राष्ट्रभक्तीचा प्रेरणादायी जनोत्सव ठरला.




**'निश्चयाचा महामेरू, बहुत जनांसी आधारू... समर्थ रामदास स्वामींनी वर्णन केलेल्या शिवरायांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय धानोरे घाटावरील सोहळ्यात आला. शिवतीर्थावर उसळलेल्या शिवभक्तांच्या महासागराने स्वराज्याचा जाज्वल्य अभिमान पुन्हा एकदा जागवला.**

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

सोमवार दि . ८ जून २०२६

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १५६ १२९ ११० | २-३ | १२० ३४६ ४९० | जोड २०-८३-६४-९५-३७ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १३९ ६९० ५८० | ३-० | १९० ४६० ००० | जोड ३१-६०-७४-९८-०२ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १७० २६० ४४० | ८-१ | १४६ १२८ ११९ | जोड ८०-२१-४७-५९-१३ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| | |
|---|---|
| 09/03/2026 | 2 2 1 8 5 8 2 1 3 1 |
| To | 3 16 4 6 56 8 7 05 8 4 43 4 3 09 3 |
| 13/03/2026 | 6 0 8 0 8 9 8 8 4 5 |
| 16/03/2026 | 4 8 2 3 4 4 1 1 6 3 |
| to | 5 56 9 0 21 8 6 02 9 2 02 3 7 38 7 |
| 20/03/2026 | 6 9 0 0 0 9 7 8 0 8 |
| 23/03/2026 | 6 3 4 1 5 7 1 2 3 1 |
| to | 8 34 5 5 46 7 6 03 8 3 46 4 3 64 6 |
| 27/03/2026 | 9 6 5 8 9 8 0 0 0 7 |
| 30/03/2026 | 2 1 1 1 2 1 1 1 1 2 |
| to | 8 90 3 3 87 6 7 97 1 1 12 5 6 66 5 |
| 03/04/2026 | 9 6 4 0 0 9 9 6 9 9 |
| 06/04/2026 | 1 2 1 7 1 4 3 1 1 4 |
| to | 3 70 2 4 02 7 3 98 7 5 82 5 2 78 6 |
| 10/04/2026 | 3 6 5 8 5 7 0 6 4 8 |
| 13/04/2026 | 5 1 1 6 2 5 1 8 2 1 |
| to | 6 06 5 4 43 7 3 45 0 3 77 9 6 85 4 |
| 17/04/2026 | 9 0 9 0 9 0 3 0 0 0 |
| 20/04/2026 | 5 1 8 4 1 3 5 3 3 3 |
| to | 7 00 2 8 58 5 2 53 5 5 71 8 4 68 7 |
| 24/04/2026 | 8 7 9 9 2 5 7 0 9 8 |
| 27/04/2026 | 3 1 4 7 1 1 6 1 6 2 |
| to | 5 63 2 4 85 8 6 71 2 7 29 9 8 27 5 |
| 01/05/2026 | 8 0 0 0 0 8 9 9 8 0 |
| 04/05/2026 | 1 3 1 6 2 2 2 2 2 2 |
| to | 7 71 9 4 34 8 3 48 7 4 25 5 4 66 5 |
| 08/05/2026 | 9 9 8 0 9 9 6 8 0 9 |
| 11/05/2026 | 5 2 3 2 6 2 1 1 4 1 |
| to | 6 79 7 7 04 3 0 68 3 9 01 2 7 85 5 |
| 15/05/2026 | 6 0 0 9 0 3 0 8 7 9 |
| 18/05/2026 | 8 4 5 1 1 1 7 4 2 2 |
| to | 9 79 5 6 96 7 4 22 2 8 30 8 8 93 5 |
| 22/05/2026 | 0 0 8 8 7 9 8 8 9 6 |
| 25/05/2026 | 5 2 3 1 8 4 1 2 4 5 |
| to | 6 11 9 4 37 3 9 78 6 9 05 5 6 06 5 |
| 29/05/2026 | 0 0 6 3 0 8 0 8 0 6 |
| 01/06/2026 | 4 1 9 1 2 5 1 |
| to | 4 89 3 9 80 2 6 82 7 21 |
| 05/06/2026 | 0 5 0 7 0 0 8 |

द•ख•ल

## उज्जैन येथे महाकाल सेनेचा स्थापना दिवस उत्साहात



**अहिल्यानगर :** महाकालाची नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उज्जैन येथे श्री महाकाल सेना सेवा संस्थानचा स्थापना दिवस ६ जून रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. देशभरातील संत-महंत, पदाधिकारी, भाविक आणि महाकाल भक्तांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात संस्थेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. स्थापना दिनाच्या विशेष कार्यक्रमात राष्ट्रीय महाकाल सेनेच्या २३ राज्यांतील नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्रातील अहिल्यानगर येथील योगी बुद्धनाथ अवघड पीर (गुरु तपस्वी योगी बाबा बम बम नाथजी) यांची राष्ट्रीय महाकाल सेनेच्या राष्ट्रीय प्रवक्ते पदी नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष योगी रोहतास नाथजी महाराज यांच्या हस्ते योगी बुद्धनाथ अवघड पीर यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक दिगंबर श्री श्री १००८ खुशाल भारतीजी महाराज, राष्ट्रीय सचिव राहुल गिरीजी महाराज यांच्यासह विविध राज्यांतील पदाधिकारी उपस्थित होते.

## हज यात्रेकरूंच्या लगेज प्रकरणावर उलेमा बोर्ड आक्रमक देशव्यापी आंदोलनाचा इशारा




**अहिल्यानगर :** हज यात्रेकरूंच्या लगेजमध्ये झालेल्या कथित चोरी, छेडछाड आणि सामान वितरणातील विलंबाच्या प्रकरणावर ऑल इंडिया उलेमा बोर्ड रजिस्टर्डने तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित यंत्रणांकडे कठोर प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रकरणाची तात्काळ दखल न घेतल्यास देशव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही बोर्डाने दिला आहे. ऑल इंडिया उलेमा बोर्ड रजिस्टर्डचे नॅशनल जनरल सेक्रेटरी अंजर अन्वर खान यांनी निवेदनात म्हटले आहे की, हज कमिटी ऑफ इंडिया, केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालय, केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू, परराष्ट्र मंत्रालय तसेच विमानतळ प्राधिकरण यांनी हज यात्रेकरूंना त्यांचे सामान वेळेवर का मिळाले नाही याबाबत स्पष्टीकरण द्यावे. इतकी कडक सुरक्षा व्यवस्था, देखरेख आणि तपासणी यंत्रणा अस्तित्वात असताना लगेजमधून चोरी आणि वस्तूंची छेडछाड कशी झाली? यात्रेकरूंच्या बॅगांचे लॉक कोणी तोडले? हज यात्रेकरूंचे सामान सुरक्षित ठेवण्यात संबंधित यंत्रणा अपयशी ठरत असतील तर त्याची जबाबदारी कोण स्वीकारणार? ऑल इंडिया उलेमा बोर्ड रजिस्टर्डने या प्रकरणात तातडीने कारवाई करण्याची मागणी केली. प्रत्येक विमानतळ आणि लगेज हबमधील सीसीटीव्ही फुटेजची सखोल तपासणी करणे, चोरी गेलेले मौल्यवान सामान शोधून परत मिळवून देणे, प्रभावित यात्रेकरूंना संपूर्ण नुकसानभरपाई देणे, दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करणे तसेच विमानतळ प्राधिकरण आणि संबंधित यंत्रणांच्या निष्काळजीपणाची उच्चस्तरीय चौकशी करणे यांचा समावेश आहे.

## खा. हांडोरे यांचा अहिल्यानगरमध्ये सत्कार



**अहिल्यानगर :** भीमशक्ती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्यसभा खासदार चंद्रकांत हांडोरे यांनी अहिल्यानगर शहरास सदिच्छा भेट दिली असता स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने त्यांचा उत्स्फूर्त सत्कार करण्यात आला. यावेळी सामाजिक, शैक्षणिक व संघटनात्मक विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच समाजातील विविध प्रश्नांबाबत मार्गदर्शन करताना खासदार हांडोरे यांनी संघटन बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. या सत्कार समारंभप्रसंगी शशिकांत बनसोडे, एन. के. कांबळे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष भाऊसाहेब साठे, शहर जिल्हाध्यक्ष संजय जगताप, अनिल साठे, मदन साठे, दशरथ शिंदे, विशाल भिंगारदिवे, अभय गायकवाड, अमोल कालकूट, अशोक खंडागळे, पोपट जाधव उपस्थित होते.

# घंटागाड्यांमध्ये ओला-सुका कचऱ्यासाठी स्वतंत्र कप्पे करा

## कष्टकरी पंचायतची महापालिकेकडे मागणी ; कचरा वर्गीकरणाच्या उद्दिष्टाला बसतोय तडा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी, शास्त्रशुद्ध आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी कचरा संकलन करणाऱ्या घंटागाड्यांमध्ये ओला व सुका कचरा वेगळा ठेवण्यासाठी स्वतंत्र कप्प्यांची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतचे जिल्हा समन्वयक विकास भाऊसाहेब उडाणशिवे यांनी केली आहे. नागरिकांकडून कचरा वर्गीकरणाबाबत सातत्याने जनजागृती केली जात असताना प्रत्यक्ष कचरा संकलन व्यवस्थेत आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने संपूर्ण प्रक्रियेची परिणामकारकता कमी होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

शहरातील विविध भागांत नागरिकांना घरगुती पातळीवर ओला आणि सुका कचरा वेगळा करून देण्याचे आवाहन महानगरपालिकेकडून सातत्याने केले जाते. अनेक नागरिकही पर्यावरणाच्या दृष्टीने जागरूकता दाखवत कचरा वर्गीकरण करून देत आहेत. मात्र, हा वर्गीकृत कचरा संकलित करण्यासाठी येणाऱ्या अनेक घंटागाड्यांमध्ये स्वतंत्र कप्प्यांची व्यवस्था नसल्याचे चित्र दिसून येत आहे. परिणामी नागरिकांनी वेगळा केलेला कचरा संकलन प्रक्रियेदरम्यान पुन्हा एकत्र होण्याची शक्यता निर्माण होत असून, त्यामुळे कचरा वर्गीकरणाच्या संकल्पनेलाच धक्का बसत असल्याचे उडाणशिवे यांनी नमूद केले.

याबाबत बोलताना सामाजिक कार्यकर्ते तथा कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतचे जिल्हा समन्वयक विकास भाऊसाहेब उडाणशिवे म्हणाले की, घनकचरा व्यवस्थापन ही केवळ नागरिकांची जबाबदारी नसून प्रशासनाचीही तितकीच महत्त्वाची भूमिका आहे. नागरिकांनी नियमांचे पालन करून ओला व सुका कचरा वेगळा दिल्यानंतर तो तसाच स्वतंत्र स्वरूपात प्रक्रिया केंद्रापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्यासाठी घंटागाड्यांमध्ये स्वतंत्र कप्पे असणे ही मूलभूत गरज आहे. अन्यथा नागरिकांच्या प्रयत्नांवर पाणी फेरले जाते आणि संपूर्ण व्यवस्थेचा उद्देशच निष्फळ ठरतो.

त्यांनी पुढे सांगितले की, शहरातील सर्व घंटागाड्यांचे महानगरपालिकेने तातडीने सर्वेक्षण करून ज्या वाहनांमध्ये स्वतंत्र कप्प्यांची व्यवस्था नाही, त्या वाहनांमध्ये आवश्यक बदल करावेत. ओला आणि सुका कचरा वेगळा संकलित व वाहतूक करण्यासाठी आवश्यक यंत्रणा उभारल्यास कचऱ्याचे पुनर्वापर, पुनर्प्रक्रिया आणि विल्हेवाट अधिक परिणामकारकपणे करता येईल. यामुळे शहरातील कचऱ्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल तसेच पर्यावरण संरक्षणालाही हातभार लागेल. उडाणशिवे यांनी नागरिकांमध्ये जनजागृतीबरोबरच प्रत्यक्ष अंमलबजावणी, नियमित देखरेख आणि जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. घनकचरा व्यवस्थापन ही केवळ कागदोपत्री योजना न राहता प्रत्यक्षात प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रशासनाने सर्व घटकांना सोबत घेऊन काम करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी कचरा वेचक, भंगार कामगार आणि पुनर्वापर क्षेत्रात कार्यरत असलेल्या कामगारांच्या भूमिकेचाही विशेष उल्लेख केला. हे कामगार शहरातील घनकचरा व्यवस्थापन साखळीतील महत्त्वाचा घटक असून पर्यावरण संवर्धनात त्यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि कौशल्याचा उपयोग करून अधिक सक्षम आणि परिणामकारक कचरा व्यवस्थापन प्रणाली विकसित करता येऊ शकते, असे त्यांनी नमूद केले. शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक बनविण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने घनकचरा व्यवस्थापनात आवश्यक सुधारणा करून घंटागाड्यांमध्ये ओला व सुका कचरा संकलनासाठी स्वतंत्र कप्प्यांची व्यवस्था तातडीने करावी, अशी मागणी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत यांच्या वतीने करण्यात आली आहे. नागरिकांच्या सहकार्याला पूरक अशी यंत्रणा उभारल्यास 'स्वच्छ अहिल्यानगर'चे उद्दिष्ट अधिक प्रभावीपणे साध्य होऊ शकणार असल्याचे उडाणशिवे यांनी स्पष्ट केले.

## शहरात अंनिसची बुवाबाजी विरोधी संघर्ष फेरी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने अहिल्यानगर शहरात विरोधी संघर्ष फेरी काढण्यात आली. अहिल्यानगर शहरातील बडी साजन मंगल कार्यालयात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व विवेक जागर संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय विस्तारित कार्यकारणीची बैठक सुरू आहे. बैठकीच्या दुसऱ्या दिवशी शनिवार दि.६ जून रोजी सायंकाळी पाच वाजता बडी साजन मंगल कार्यालय ते कोठी रोड मार्गे बाजार समिती पर्यंत आणि बाजार समिती ते जुने बसस्थानक मार्गे बडिसजन मंगल कार्यालया पर्यंत विरोधी संघर्ष फेरी काढण्यात आली.

महा. अंनिसचे राज्य अध्यक्ष माधव बावगे, राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे, राज्य प्रधान सचिव ठकसेन गोराणे, राज्य निमंत्रित कॉ. बाबा आरगडे, राज्य कार्यवाह अॅड. रंजना गवांदे, प्रधान सचिव गजेंद्र सुरकार, विनायक सावळे, रूकसाना मुल्ला, विजय परब, राज्य सरचिटणीस शहाजी भोसले, सुधाकर काशीद, कृष्णात स्वाती, आरती नाईक, उत्तरेश्वर बिराजदार, सुरेश बोरसे, विलास निंबोरकर, मच्छिंद्रनाथ मुंडे, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बुधवंत, कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड, उपाध्यक्ष प्रमोद भारुळे व डॉ.प्रकाश गरुड, जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा, सोशल मिडिया कार्यवाह सुखदेव फुलारी, नगर शहराध्यक्ष भारतभूषण भागवत,शहर कार्याध्यक्ष विनायक ताकपेरे, शहर प्रधान सचिव ठकाजी जगधने,सतीष केदार, बि.के. चव्हाण यांचेसह महाराष्ट्र राज्यातील ३६ जिल्ह्यातील ३५० हून अधिक पदाधिकारी या फेरीमध्ये सहभागी झाले होते. जादूटोणा विरोधी कायद्याची कठोर अंमलबजावणी,झालीच पाहिजे, झालीच पाहिजे पोलीस ठाणे तेथे अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष,झालेच पाहिजे, खात्री होता भोंदूगिरीची,तक्रार नोंदवा बुवाबाजीची, बुवा जर आहेच मत्कारी..दवाखान्याची का चढतो पायरी? शहाणपणाने विचार करा..भोंदूगिरीला नको थारा माय, भगिनींनो वेळ नाही बरी, आपणच बाळगू सावधगिरी, भोंदूंचा नाद सोडा, गुलामगिरीतून बाहेर पडा, अशा विविध घोषणानी नगर शहर दणाणून निघाले. बडी साजन मंगल कार्यालय या फेरीचा समारोप झाला.

## निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्था शेतकरी हिताची : वळसे पा.

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**पारनेर / निघोज :** निघोज ग्रामीण संस्था परिवाराचे संस्थापक अध्यक्ष स्व.बाबासाहेब कवाद यांनी सहकार चळवळीत काम करताना शेतकरी हितासाठी निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेची स्थापना करुन परिसरातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कमी पाण्यात व कमी खर्चात शेती करण्यासाठी मार्गदर्शन केले. या संस्थेच्या माध्यमातून कवाद यांच्या कार्याचे अनुकरण करीत संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत लामखडे, उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी या संस्थेच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबवीत परिसरातील शेतकऱ्यांना आर्थिक बळ उपलब्ध करून दिल्याचे प्रतिपादन भिमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदिप वळसे पाटील यांनी व्यक्त केले आहे. वळसे पाटील यांनी निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेच्या गांडूळ खत प्रकल्पाला भेट दिली. यावेळी अमृत रसाळ, रामचंद्र ढोबळे, प्रकाश वायसे, ठकाराम लंके, सोमेश्वर दिक्षीत, रविंद्र रसाळ, दत्तात्रय वरखडे, शिवप्रसाद शेवाळे, पोपटराव तरटे उपस्थित होते. यावेळी वळसे पाटील म्हणाले संस्था हिताचे निर्णय घेताना शेतकऱ्यांसाठी काय केले पाहिजे हा दृष्टिकोन संस्था पदाधिकारी व संचालक मंडळ यांनी घेतल्याने ही संस्था आज उर्जीतावस्थेत असून या परिसरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शकाची भूमिका घेऊन संस्थेने पाठबळ दिले आहे. या संस्थेच्या गांडूळ खत प्रकल्पाची माहिती सोशल मिडिया माध्यमातून आम्हाला मिळाली. असाच शेतकरी हिताचा प्रकल्प आपण कारखाना माध्यमातून सुरू करणार आहोत. म्हणून एका आदर्श प्रकल्पाची पाहणी करण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतल्याने या ठिकाणी हा गांडुळ खत प्रकल्प, नियोजन, व्यवस्थापन, या खताची गुणप्रत प्रत्यक्ष पाहावयास मिळाली. संस्था पदाधिकारी व संचालक मंडळ तसेच अधिकारी व कर्मचारी यांनी अतिशय निटनेटके नियोजन करीत परिसरातील शेतकऱ्यांना या गांडूळ खत प्रकल्पाचा मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. यावेळी अमृताशेठ रसाळ म्हणाले संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब कवाद यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था २५ वर्षे काम करीत आहे. कवाद यांचे विचार सर्वसामान्य जनतेला रोजगार मिळाला पाहिजे. संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पाठबळ मिळाले पाहिजे याच विचाराने प्रेरीत होऊन संचालक मंडळ काम करीत आहे.

## अधिक मासानिमित्त स्वामी समर्थ मंदिरात विष्णुयाग सोहळा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** अधिक मास अर्थात पुरुषोत्तम मासानिमित्त श्री गुरुचरित्र सत्संग परिवाराच्या वतीने सावेडी उपनगरात स्वामी समर्थ मंदिर, सावली सोसायटी, गुलमोहोर रोड येथे आयोजित करण्यात आलेला भव्य विष्णुयाग सोहळा रविवारी अत्यंत भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. या धार्मिक सोहळ्यास शहरातील तसेच परिसरातील असंख्य भाविक भक्तांनी उपस्थित राहून विविध धार्मिक विधींचा लाभ घेतला.

हिंदू धर्मशास्त्रानुसार अधिक मास हा भगवान विष्णूंना समर्पित असून या महिन्यात केलेली उपासना, जप, तप, दानधर्म व धार्मिक विधी अनेक पटींनी फलदायी ठरतात. याच भावनेतून श्री गुरुचरित्र सत्संग परिवाराच्या वतीने या विशेष धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची गर्दी सुरू झाली होती. संपूर्ण परिसरात धार्मिक उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरणाचे दर्शन घडत होते.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ६ वाजता मंगल मंत्रोच्चार आणि गणेशपूजनाने करण्यात आली. त्यानंतर विधिवत विष्णुयाग संपन्न झाला. वेदपाठी ब्राह्मणांच्या मंत्रघोषात यज्ञकुंडात विविध आहुती अर्पण करण्यात आल्या. यज्ञाच्या वेळी उपस्थित भाविकांनी भगवान विष्णूंचा जयघोष केला.

यावेळी सामूहिक सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले. अनेक कुटुंबांनी या पूजेमध्ये सहभागी होत आपल्या कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. यावेळी आ. संग्राम जगताप, नगरसेवक निखिल वारे, अमोल गाडे, अनिल बोरुडे, पुष्पा बोरुडे, किशोर डागवाले, आशा डागवाले, अभय आगरकर, डॉ. हर्षवर्धन तन्वीर उपस्थित होते. सत्यनारायण कथा श्रवणासाठीही भाविक उपस्थित होते. पूजेनंतर विष्णु सहस्रनाम पठणाचा कार्यक्रम पार पडला. शेकडो भाविकांनी सामूहिकरित्या विष्णु सहस्रनामाचे पठण करून भक्तीभाव व्यक्त केला. यावेळी मंदिर परिसर ॐ नमो भगवते वासुदेवाय या मंत्राने दुमदुमून गेला होता.

तसेच भगवान विष्णूंना तुलसी व पुष्प अर्चन करण्यात आले. भाविकांनी भक्तिभावाने तुलसीदल अर्पण करून भगवान विष्णूंचे दर्शन घेतले. संपूर्ण कार्यक्रमात आध्यात्मिक ऊर्जा आणि भक्तिमय वातावरण अनुभवण्यास मिळाले. अनेक भाविकांनी अधिक मासात अशा प्रकारचे धार्मिक कार्यक्रम समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करतात, अशी भावना व्यक्त केली.

कार्यक्रमाचे वेळी मंदिर परिसरात शिस्तबद्ध व्यवस्था करण्यात आली होती. भाविकांच्या सोयीसाठी सकाळी अल्पोपहार, पिण्याचे पाणी, बसण्याची व्यवस्था तसेच महाप्रसादाचे नियोजन करण्यात आले होते. त्यामुळे सर्व धार्मिक विधी सुरळीतपणे पार पडले. पौराहित्य श्रीधर होशिंग, मयूर कुलकर्णी, प्रवीण भालेराव, अनिल केसकर यांनी केले.

या सोहळ्यास महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच बालकांचीही मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. दिवसभर भाविकांची दर्शनासाठी आणि पूजाविधीत सहभागी होण्यासाठी गर्दी कायम होती.

## श्री स्वामी समर्थ मंदिर अध्यात्मिक संस्काराचे केंद्र : भोसले



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** संत-महंतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली महाराष्ट्राची भूमी ही अध्यात्म, संस्कार आणि समाजप्रबोधनाची भूमी म्हणून ओळखली जाते. संतांचे विचार, त्यांचे कार्य आणि त्यांनी दिलेले जीवनमूल्यांचे संदेश धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचत असतात. अशाच अध्यात्मिक वातावरणाने नटलेल्या सारसनगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिर व बालसंस्कार केंद्र परिसराच्या सुशोभीकरण कामाचा लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

नगरसेविका मीनाताई संजय चोपडा यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून तसेच आमदार संग्राम जगताप यांच्या स्थानिक विकास निधीतून मंदिर परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले असून या कामामुळे परिसराचे सौंदर्य अधिक खुलून आले आहे. मंदिर परिसर आता केवळ धार्मिक स्थळ न राहता अध्यात्म, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीचे प्रेरणास्थान बनला आहे. लोकार्पण सोहळ्याप्रसंगी बोलताना माजी उपमहापौर गणेश भोसले म्हणाले की, आपली संस्कृती ही जगातील सर्वात समृद्ध संस्कृती आहे. संतांचे विचार समाजाला दिशा देणारे आणि माणुसकीची शिकवण देणारे आहेत.

## ग्रामीण भागातील मुलींचे यश प्रेरणादायी : आ. दाते



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

### मुंबई पोलीस दलात निवडीबद्दल वडगाव सावताळच्या कन्यांचा गौरव

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथील काजल मच्छिंद्र खामकर व सुप्रिया अशोक आंधळे यांची मुंबई पोलीस खात्यात कॉन्स्टेबल पदावर नियुक्ती झाल्याबद्दल पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. काशिनाथ दाते सर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून गौरव करण्यात आला. या सत्कार समारंभास जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंतराव चेडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, आर. एस. कापसे सर, देवराम शेठ मगर, सुभाषराव सासवडे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका महिला अध्यक्षा सुषमाताई रावडे, भाऊसाहेब खामकर सर, दत्तात्रय सरोदे, प्रदीप रोकडे, माजी सरपंच बाबासाहेब शिंदे, कैलास खामकर, मंगेश खामकर, तुषार खामकर, विठ्ठल खामकर, शैलेश जांभळकर, शुभम आंधळे, विठ्ठल बर्डे, अमोल शिंदे, आप्पा गायकवाड, जयवंत खामकर, विश्वनाथ गोरडे, शुभम चौधरी, दिपक खामकर, मच्छिंद्र खामकर, इरफान शेख यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व तालुक्यातील विविध गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्कारानंतर उपस्थित मान्यवरांनी दोन्ही युवतींचे अभिनंदन करत त्यांच्या भावी सेवेसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला. ग्रामीण भागातील मुलींनी कठोर परिश्रम, चिकाटी आणि ध्येयाप्रती असलेली निष्ठा यांच्या बळावर मिळविलेले हे यश निश्चितच नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# जि. प. कर्मचारी सोसायटीने सभासदांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केले : मोरे

## ९९ वी वार्षिक सभा खेळीमेळीत संपन्न

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** गेल्या ९९ वर्षांची उत्कृष्ट परंपरा असलेल्या अहिल्यानगर जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीचा कारभार आणि संस्थेकडून सभासदांसाठी राबविले जाणारे उपक्रम सहकारी संस्थांसाठी पथदर्शक असून या संस्थेने जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या आर्थिक गरजा भागवत त्यांना खऱ्या अर्थाने आर्थिकदृष्ट्या सक्षम केले आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात संस्थेच्या २ इमारती उभ्या राहिल्या आहेत. ही महत्वाची बाब असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे यांनी केले.

अहिल्यानगर जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीची ९९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार (दि. ७) नगर मधील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, टिळक रोड येथे आयोजित करण्यात आली होती. या सभेच्या अध्यक्षस्थानी मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे, तर प्रमुख पाहुणे म्हणून व्याख्याते अविनाश भारती, जिल्हा साथरोग व हिवताप अधिकारी डॉ. नारायण वायभासे हे उपस्थित होते. प्रारंभी सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गुणगौरव सन्मान चिन्ह व रोख बक्षिसे देवून करण्यात आला.

यावेळी व्याख्याते अविनाश भारती यांनी विविध उदाहरणे देत मुलांवर खरे संस्कार कुटुंबातच होतात, त्यामुळे उद्याचे चांगले नागरिक घडविण्यासाठी आपल्या मुलांवर चांगले संस्कार व्हावेत, मात्र आपल्या अपेक्षा मुलांवर लादू नये. मुलांनीही ध्येय निश्चित करून पुढील वाटचाल करावी, जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर जिद्द आवश्यक आहे. असे ते म्हणाले.

सभेचे प्रास्ताविक चेअरमन संजय कडूस यांनी करत संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला. सभेच्या विषय पत्रिकेवर चर्चेला सुरुवात झाल्या नंतर सर्व उपस्थित सभासदांना बोलण्याची संधी देत त्यांचे म्हणणे ऐकून घेत जो पर्यंत त्यांच्या शंकांचे निरसन होत नाही तोपर्यंत प्रत्येक विषयावर सविस्तर चर्चा संचालक मंडळाने घडवून आणली.

या सभेत संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार पोटनियम दुरुस्ती, सभासद कर्ज मर्यादा २२ लाखापर्यंत वाढविणे, विवाहभेट योजनेची रक्कम ५ हजारांवरून ११ हजार रुपये करणे, नवीन बांधकाम सुरु असलेल्या इमारतीमध्ये करावयाच्या विद्युत यंत्रणा व फर्निचर खर्चास मान्यता देणे, संस्थेच्या सुधारित आदर्शउपविधीला मान्यता देणे यासह विषय पत्रिकेवरील सर्व विषयांना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

यावेळी सभासद विकास साळुंके, अभय गट, विजय कोरडे, संभाजी आव्हाड, राजू जरे, प्रवीण राऊत, शिवहरी दराडे, निलेश गाडेकर, कैलास भडके, राजू म्हस्के, शशिकांत रासकर, विलास वाघ, गणेश पवार, एकनाथ पालवे, आदिनाथ मोरे, दिपक गोधडे, प्रमोद झरेकर,भरत घुगे, यांनी चर्चेत सहभाग घेतला. सभासदांच्या प्रश्नांना चेअरमन संजय कडूस, व्यवस्थापक राजेंद्र पवार आदींनी उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन केले. सभेस व्हाईस चेअरमन अर्जुन मंडलिक, संचालक विलास शेळके, अरुण जोर्वेकर, प्रशांत मोरे, विक्रम ससे, चंदकांत संसारे, इंजी. राजू दिघे, भाऊसाहेब चांदणे, कल्याण मुटकुळे, डॉ. दिलीप डांगे ,ऋषीकेश बनकर, स्वप्नील शिंदे, सुधीर खेडकर, श्रीकांत देशमाने, काशिनाथ नरोडे, कैलास डावरे, योगेंद्र पालवे, श्रीमती ज्योती पवार, श्रीमती सुरेखा महारनुर, श्रीमती मनिषा साळवे, अभिजित पवार, चेतन चव्हाण, उप व्यवस्थापक प्रशांत लोखंडे व कर्मचारी वृंद तसेच जिल्हाभरातून आलेले सभासद उपस्थित होते.

# द • ख • ल

## व्यवसायातील वर्चस्व आणि कुटुंबाचा आधारवड

**आळंदी :** अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि कुटुंबाप्रती असलेल्या समर्पणाच्या बळावर व्यवसाय क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या निर्मला अनिल भांबुर्डेकर यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीचा सोहळा नुकताच उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कै.अनिल भांबुर्डेकर यांच्या निधनानंतर १९८२ पासून सुरू असलेल्या 'भांबुर्डेकर सराफ अँड ज्वेलर्स' या प्रतिष्ठित व्यवसायाची जबाबदारी निर्मलाताईंनी समर्थपणे सांभाळली. पारंपरिक मूल्यांची जपणूक करत आधुनिक व्यावसायिक दृष्टीकोन स्वीकारत त्यांनी व्यवसायाला नवे आयाम प्राप्त करून दिले. त्यामुळे आळंदी व परिसरात यशस्वी महिला उद्योजिका म्हणून त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. निर्मला यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवसायाची यशस्वी वाटचाल सुरू असून आज त्यांची मुले, सुना आणि नातवंडेही व्यवसायात सक्रिय सहभाग घेत आहेत. कुटुंबातील प्रत्येक सदस्याच्या कार्यातून त्यांच्या संस्कारांचा आणि मूल्यांचा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो. षष्ट्यब्दिपूर्ती सोहळ्यानिमित्त नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी निर्मलाताईंना निरोगी, आनंदी आणि दीर्घायुषी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. कष्ट, जिद्द, प्रामाणिकपणा आणि सामाजिक विश्वास यांच्या बळावर उभारलेले यशस्वी व्यक्तिमत्त्व म्हणून निर्मलाताई भांबुर्डेकर यांच्याकडे पाहिले जाते. व्यवसायातील यशासोबतच कुटुंबाला एकत्र बांधून ठेवणारा आधारवड म्हणूनही त्यांचा गौरव करण्यात आला.

## पिकअप-दुचाकी धडक; दुचाकीस्वार गंभीर जखमी

**आळेफाटा :** अहिल्यानगर -कल्याण महामार्गावर करंजाळे गावच्या हद्दीत शनिवार (ता. ७) रोजी सकाळी १०:१५ वाजण्याच्या सुमारास पिकअप आणि दुचाकीच्या भीषण अपघात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एम. एच. १४ के. ए.४३७७ क्रमांकाची पिकअप कल्याणकडून आळेफाट्याच्या दिशेने जात होती. तर एम. एच. १४ई. जे.७८६३क्रमांकाची दुचाकी ओतूरकडून कल्याणच्या दिशेने जात होती. करंजाळे गावाजवळ दोन्ही वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाली.या अपघात दुचाकीस्वार रामदास दशरथ घोगरे, रा. खानगाव हे गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार नामदेव बांबळे, शामसुंदर जायभाये आणि ट्रॅफिक वार्डन शुभम काशीद यांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. पुढील तपास ओतूर पोलीस करीत आहेत.महामार्गावर सकाळच्या वेळी वाहनांचा वेग जास्त असतो. त्यामुळे वाहनचालकांनी विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन ओतूर पोलिसांनी केले आहे.






## पुणे ग्रँड टूरला यूसीआयचे जागतिक पाठबळ

**पुणे, :** जागतिक सायकलिंगची सर्वोच्च संघटना युनियन सायक्लिस्ट इंटरनॅशनल (यूसीआय) ने पुणे ग्रँड टूर (पीजीटी) स्पर्धेला भविष्यात जगातील चौथी ग्रँड टूर म्हणून विकसित करण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली आहे. इटलीतील लेक गार्डा येथे झालेल्या यूसीआय व्यवस्थापन समितीच्या बैठकीत स्पर्धेच्या पहिल्या आवृत्तीचे विशेष कौतुक करण्यात आले. पाच दिवस चाललेल्या स्पर्धेला २५ लाखांहून अधिक प्रेक्षक उपस्थित राहिल्याची नोंद घेत यूसीआयने प्रेक्षकांची शिस्त तसेच पोलीस व प्रशासनाच्या व्यवस्थेचे अभिनंदन केले. स्पर्धेच्या दीर्घकालीन विकासासाठी आणि भारतातील तळागाळातील सायकलिंगला चालना देण्यासाठी मदतीचे आश्वासनही देण्यात आले. या बैठकीसाठी पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया सरचिटणीस मनिंदर पाल सिंह आणि बजाज ऑटो संचालक अभिनव बिंद्रा यांचा समावेश असलेल्या शिष्टमंडळाने स्पर्धेचा आढावा सादर केला. पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले की, यूसीआयने पुणे ग्रँड टूरला यूसीआय २.१ दर्जा मंजूर केला असून २०२७ मधील स्पर्धा २६ ते ३१ जानेवारीदरम्यान आयोजित करण्यास संमती दिली आहे. यावेळी यूसीआय अध्यक्ष डेव्हिड लॅपार्टिएंट यांनी पुणे ग्रँड टूरला युरोपबाहेरील भविष्यातील ग्रँड टूर विकसित करण्याची मोठी संधी असल्याचे सांगितले. पुढील वर्षीच्या स्पर्धेला स्वतः उपस्थित राहणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. जागतिक सायकलिंग संघटनेकडून मिळालेला हा पाठिंबा पुण्याला आंतरराष्ट्रीय सायकलिंग नकाशावर अधिक भक्कम स्थान मिळवून देणारा ठरणार असल्याचे मानले जात आहे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते 'राजमाता जिजाऊ' बस सेवेचे लोकार्पण..!

## एसटी महामंडळाने प्रवाशांच्या समस्या सोडविण्यावर भर द्यावा : उपमुख्यमंत्री

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती आगारात नव्याने दाखल करण्यात झालेल्या १० 'राजमाता जिजाऊ' या अत्याधुनिक स्मार्ट बस सेवेचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते (दि:७) रोजी लोकार्पण करण्यात आले. स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती तालुक्यातील पायाभूत सुविधा विकासाला नेहमीच प्राधान्य दिले. त्यापैकीच एक आणि देशात मॉडेल बनलेल्या बारामती बसस्थानकाचा परिसर, बसमधील स्वच्छता राखणे, बस वेळेवर सोडण्यासह प्रवाशांची सुरक्षितता आणि त्यांच्या समस्या सोडविण्यावर राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) भर द्यावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी दिले.



'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान २०२५' या अभियानात अव्वल स्थान पटकावल्याबद्दल बारामती बसस्थानक येथे आयोजित एसटी महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अभिनंदन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी नगराध्यक्ष सचिन सातव, उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे, बारामती 'एमआयडीसी'चे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष संभाजी होळकर, एसटी महामंडळाचे पुणे विभाग नियंत्रक अरुण सिया, गट विकास अधिकारी किशोर माने, न.प. मुख्याधिकारी पंकज भुसे, विभागीय कामगार अधिकारी सचिन भुजबळ, आगार व्यवस्थापक प्रविण शिंदे, माजी सहाय्यक वाहतूक अधिक्षक घनश्याम सदाशिव शिंदे.

यांच्यासह महामंडळाचे कर्मचारी, संघटनेचे पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान २०२५' या अभियानात अव्वल स्थान पटकावल्याबद्दल बारामती बसस्थानकाला रुपये १ कोटींचे बक्षीस आणि स्मृतिचिन्ह मुंबई येथील कार्यक्रमात प्रदान करण्यात आले. स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दूरदृष्टीकोनातून बारामती तालुक्यात विविध विकास कामे पूर्ण झाली आहेत. या कामांची निगा राखत तालुका विकासाच्या बाबतीत कायम प्रथमस्थानी राहण्यासाठी प्रयत्नशील राहावे. त्यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या बसस्थानकाला राज्यास प्रथम बक्षीस मिळण ही संपूर्ण बारामतीकरांसाठी अभिमानाची बाब आहे. यामुळे आता बारामतीच्या मानात आणखीन एक मानाचा तुरा रोवला आहे. या बक्षीसाच्या माध्यमातून नागरिकांची जबाबदारी वाढलेली आहे, असे सांगून त्यांनी या ऐतिहासिक कामगिरीबद्दल बारामतीकरांचे आणि महामंडळाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

# बेलसर टोल माफिसाठी सात गावांचा एल्गार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** पुरंदर तालुक्यातील बेलसर टोल नाक्यावर स्थानिक नागरिकांकडून होत असलेल्या सक्तीच्या टोल वसुलीविरोधात सात गावांतील ग्रामस्थ आक्रमक झाले असून, स्थानिक वाहनांना कायमस्वरूपी टोल माफी देण्याच्या मागणीसाठी आज (७ जून) जनआंदोलन पुकारण्यात आले होते. यासंदर्भात पुणे जिल्हा परिषद सदस्य अजय इंगळे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पुणे विभागीय कार्यालयाकडे लेखी निवेदन सादर करण्यात आले.बेलसर टोल नाक्यापासून २० किलोमीटर परिसरातील स्थानिक नागरिकांना आणि वाहनांना टोलमधून कायमस्वरूपी सूट द्यावी, अशी प्रमुख मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. खळद, शिवरी, वाळूंज, निळूंज, तक्रारवाडी, साकुर्डे आणि बेलसर या गावांतील नागरिकांचे शेती, शिक्षण, आरोग्य, रोजगार तसेच दैनंदिन व्यवहारांसाठी या मार्गावर सातत्याने आवागमन सुरू असते. त्यामुळे हा मार्ग स्थानिकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे.मात्र, बेलसर टोल नाक्यावर स्थानिकांकडून वारंवार टोल वसूल केला जात असल्याने शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे. यामुळे परिसरात नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून स्थानिकांना दिलासा द्यावा., अशी मागणी करण्यात आली आहे.



# अवैध गर्भपातप्रकरणी दोन डॉक्टरांवर गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**केडगाव, ता. दौंड :** पुणे जिल्ह्यातील केडगाव येथे अवैधरित्या गर्भपात केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, याप्रकरणी दोन डॉक्टरांविरुद्ध यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वैद्यकीय गर्भपात कायद्याचे उल्लंघन करून गर्भपात करण्यात आल्याचा आरोप असून, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. यवत पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यानुसार, दि. ६ जून २०२६ रोजी दुपारी सुमारे १.४५ वाजण्याच्या सुमारास केडगाव येथील लवंगारे मॅटर्निटी अँड इन्फर्टिलिटी हॉस्पिटलमध्ये हा प्रकार घडल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी वैद्यकीय अधीक्षक सचिन विठ्ठल गुजर यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, वैद्यकीय व्यवसायिक स्वाती लवंगारे (केडगाव, ता. दौंड) आणि वैद्यकीय व्यवसायिक तुकाराम यशवंत मोटे (उरुळी कांचन, ता. हवेली) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेतील विविध कलमे तसेच वैद्यकीय गर्भपात कायदा, १९७१ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. तक्रारीनुसार, स्वाती लवंगारे यांनी गर्भपातासाठी आवश्यक अधिकृत नोंदणी अथवा परवानगी नसतानाही गर्भपाताच्या गोळ्यांचा साठा करून संबंधित महिलेचा अवैधरित्या गर्भपात केल्याचा आरोप आहे. तसेच तुकाराम मोटे यांनी गर्भपातासाठी वापरण्यात आलेल्या औषधांच्या नोंदीमध्ये स्वतः चे नाव व सही केल्याचे तपासात आढळून आल्याचा उल्लेख फिर्यादीत करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर आरोग्य विभागाने तपास सुरू केला असून, संबंधित कागदपत्रे व औषधांच्या नोंदींची पडताळणी करण्यात येत आहे. गर्भपातासंदर्भातील नियमांचे उल्लंघन झाले का तसेच संबंधित डॉक्टरांकडे आवश्यक परवानग्या होत्या का, याचा सखोल तपास केला जात आहे.यवत पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला असून, या प्रकरणातील सर्व तथ्ये तपासाअंती समोर येणार आहेत. पोलीस उपनिरीक्षक किशोर वागज हे तपास करीत असून, गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पोलीस उपनिरीक्षक अजय मोरे यांनी पूर्ण केली.अवैध गर्भपातासारख्या संवेदनशील आणि गंभीर प्रकरणामुळे वैद्यकीय क्षेत्रातील नियमांचे पालन, रुग्णांच्या सुरक्षेचे प्रश्न आणि आरोग्य व्यवस्थेतील उत्तरदायित्व याबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. पोलिस तपासातून या प्रकरणातील नेमकी वस्तुस्थिती पुढे येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# साडेतीन हजाराहून अधिक सायकलप्रेमींचा उत्स्फूर्त सहभाग

## जागतिक सायकल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभाग

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** जागतिक सायकल दिनानिमित्त महाळुंगे-बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात युवक कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने आयोजित उपक्रमाला सुमारे ३ हजार ५०० हून अधिक सायकलप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमात सर्वांसाठी २५ किमी व ५० किमी अंतराच्या सायकल फेऱ्यांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच 'अस्मिता - खेलो इंडिया' अंतर्गत महिला व मुलींसाठी विशेष ५ किमी, ७ किमी आणि १० किमी गट आयोजित करण्यात आले. शरीर तंदुरुस्त, पर्यावरण संवर्धन आणि सायकल संस्कृतीचा प्रसार हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणी भारतीय क्रीडा प्राधिकरण व क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे, महाराष्ट्र सायकल असोसिएशन आणि लोहा फाउंडेशन यांनी यशस्वीरित्या पार पाडली.या प्रसंगी सायकल रॅलीस महापौर मंजूषा नागपुरे, अर्जुन पुरस्कारार्थी शांताराम जाधव यांनी झेंडा दाखवून प्रारंभ करण्यात आला. यावेळी अपर पोलीस महासंचालक कृष्ण प्रकाश, श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल उपसंचालक संजय सबनीस, डाकार रॅली वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धक संजय टकले, जीएम - सेल्स अँड मार्केटिंग, अवोन सायकलचे व्यवस्थापक सुलेख कौशिक, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, सायकलिंग फेडरेशन ऑफ महाराष्ट्रचे अभिजित मोहिते, क्रीडा प्रबोधनी बालेवाडीचे प्राचार्य तथा राज्य क्रीडा मार्गदर्शक दीपाली पाटील तसेच फीट इंडियाचे सदिच्छादूत कु. दीक्षा आणि कु. स्वप्नाली उपस्थित होते.

## माजी मंत्री अनंतराव थोपटे यांच्या कुटुंबीयांचे डॉ. नीलम गोऱ्हेंकडून सांत्वन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राज्याचे माजी मंत्री व ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांच्या निधनानंतर शिवसेना नेत्या व आ.डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले.डॉ. गोऱ्हे यांनी अनंतराव थोपटे यांचे चिरंजीव व माजी आमदार तसेच अन्य कुटुंबीयांची भेट घेत त्यांच्या दुःखात सहभागी होत धीर दिला. यावेळी त्यांनी अनंतराव थोपटे यांच्या राजकीय, सामाजिक आणि जनसेवेतील योगदानाची आठवण करून दिली. त्यांच्या निधनाने सार्वजनिक जीवनातील एक अभ्यासू व जनसामान्यांशी नाळ जुळलेला नेता हरपल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.यावेळी, रमेश कोंडे, बाळासाहेब चांदेरे, किरण साळी, निलेश घारे, अमोल पांगारे, गणेश निगडे, अजित ढोकळे उपस्थित होते. उपस्थितांनीही थोपटे यांच्या कार्याला श्रद्धांजली वाहत कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या.नंतराव थोपटे यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत ग्रामीण भागातील विकास आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम केले. त्यांच्या निधनाने राजकीय व सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



# हवेलीतील ५५ हजार विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी मोफत पाठ्यपुस्तके

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हातात नवी कोरी पाठ्यपुस्तके पोहोचावीत यासाठी हवेली तालुका प्रशासनाने व्यापक नियोजन केले असून, तालुक्यातील जिल्हा परिषद, खाजगी अनुदानित आणि कॅन्टोन्मेंट बोर्ड शाळांमधील एकूण ५५ हजार ७२३ विद्यार्थ्यांना ३ लाख ३१ हजार ३५० पाठ्यपुस्तकांचे मोफत वाटप करण्यात येत आहे. अशी माहिती हवेली पंचायत समिती शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी हेमंतकुमार खाडे यांनी दिली.

हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे आणि हवेली पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शेखर शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली न्यू इंग्लिश स्कूल, कोलवडी येथून सर्व केंद्र शाळांकडे आणि तेथून संबंधित शाळांपर्यंत पाठ्यपुस्तके पोहोचविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे.



या संपूर्ण प्रक्रियेचे नियोजन तालुक्यातील विशेष शिक्षक व विषय तज्ज्ञांच्या समितीमार्फत करण्यात आले आहे. प्रत्येक केंद्रासाठी आवश्यक पुस्तकांची संख्या, वितरण व्यवस्था आणि वेळापत्रक निश्चित करण्यात आले असून, कोणताही विद्यार्थी पुस्तकांपासून वंचित राहू नये यासाठी शिक्षण विभाग, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक, विषय तज्ज्ञ आणि विशेष शिक्षक यांची टीम कार्यरत आहे.

हवेली तालुक्यात शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत नव्या कोऱ्या पाठ्यपुस्तकांनी होणार असल्याने विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमामुळे हवेली तालुक्याच्या शिक्षण विभागाच्या कार्यक्षमतेचे जिल्हाभरातून कौतुक होत आहे.

> ''तालुक्यातील एकही विद्यार्थी शाळेच्या पहिल्या दिवशी पुस्तकांशिवाय राहू नये, यासाठी संपूर्ण शिक्षण यंत्रणा समन्वयाने काम करत आहे. सर्व विद्यार्थ्यांपर्यंत वेळेत पाठ्यपुस्तके पोहोचविण्याचे उद्दिष्ट पूर्ण केले जात आहे.''
>
> **– शिक्षण विभाग, हवेली पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी हेमंतकुमार खाडे**

# माईंच्या लेकी-जावयांच्या सन्मान सोहळ्यात भावनांचा महापूर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांनी उभारलेल्या विशाल कुटुंबातील मायेचा, संस्कारांचा आणि जिव्हाळ्याच्या नात्यांचा प्रत्यय ममता बाल सदन (बालगृह), कुंभारवळण येथे आयोजित अधिक मासाचे वाण – माईंच्या लेक-जावयांचा सन्मान या सोहळ्यात पुन्हा एकदा आला. अधिक मासानिमित्त आयोजित या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमात भावनांचा अक्षरशः महापूर उसळला.




यावेळी पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या कन्या ममता सपकाळ, कीर्ती, ज्योती, मंजुषा आणि गौरी यांनी भावना व्यक्त करताना संस्थेचे अध्यक्ष दीपक गायकवाड यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. माईंच्या जाण्यानंतरही त्यांनी कुटुंबप्रमुख म्हणून सर्वांची जबाबदारी सांभाळत कुटुंबातील नातेसंबंध जपले असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या मनोगतातून कृतज्ञतेची भावना व्यक्त होत असताना उपस्थितांचे डोळेही पाणावले.

पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांनी १९९२ मध्ये स्थापन केलेल्या ममता बाल सदन संस्थेत आजपर्यंत २२० मुलींची विवाहसोहळ्यांसह पाठवणी करण्यात आली आहे. या सर्व मुली आज आपल्या संसारात स्थिरावल्या असून संस्थेचे मोठे कुटुंब निर्माण झाले आहे. अधिक मासाच्या पारंपरिक प्रथेचे जतन करत संस्थेतर्फे लेकी व जावयांचा सन्मान करण्यात आला. जावयांना नवीन पोशाख, तर लेकींना साडी-चोळी, जोडवे, तामणदीप, निरंजन, ३३ अनारसे आणि तुळशीचे रोप भेट देण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष दीपक गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांचे चिरंजीव अरुण सपकाळ, लामा फेरा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सत्येंद्र शुक्ला, शर्मिष्ठा जाधव, अनुश्री रिसवाडकर, शास्वती रिसवाडकर, बजरंग वाघ, चिंतामणी हॉस्पिटलचे डॉ. संजय रावळ, डॉ. दिलीप वाघोलीकर, डॉ. वांढेकर, डॉ. शेट्टी, अनिकेत खरे, पूजा खरे, शीतल सिनगारे, विनय सपकाळ, मनीष बोपटे आणि देविदास अरबट यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मानपत्र व तुळशीचे रोप देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ममता बाल सदन संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. माईंच्या विचारांची, संस्कारांची आणि ममतेची परंपरा आजही तितक्याच ताकदीने पुढे जात असल्याचे भावस्पर्शी चित्र या सोहळ्यात पाहायला मिळाले.

कृतज्ञता आणि अश्रूंच्या साक्षीने भारावला परिसर : काही नाती रक्ताची नसली तरी ती रक्ताच्या नात्यांपेक्षाही अधिक घट्ट असतात, याचा प्रत्यय या सोहळ्यात आला. माईंच्या जाण्यानंतरही त्यांचे कुटुंब विखुरले नाही, तर अधिक घट्टपणे एकत्र राहिले आहे. कुटुंबातील नाती जपण्याचे कार्य दीपक गायकवाड यांनी सातत्याने केल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. त्यामुळे संपूर्ण परिसर मायेच्या, कृतज्ञतेच्या आणि भावनांच्या वातावरणाने भारावून गेला.

अनेक लोकप्रतिनिधींच्या सदिच्छा भेटी : या सोहळ्यास माजी आमदार अशोक टेकवडे, सासवड नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा आनंदी जगताप, राजवर्धिनी जगताप, जिल्हा परिषद सदस्य अजय इंगळे, रश्मी कोलते, हरिभाऊ लोळे, शशिकला कोलते, न्यायालयाचे संजय खामकर, पंचायत समितीचे माजी सभापती प्रवीण जगताप, जितेंद्र कांबळे, पांडुरंग भोसले, उद्योजक अजित गोळे यांच्यासह जिल्ह्यातील अनेक लोकप्रतिनिधींनी सदिच्छा भेट देऊन लेक-जावयांना शुभेच्छा दिल्या. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या नागरिकांनीही सोहळ्यास उपस्थिती दर्शविली. ठाणे येथील ८० वर्षीय रंजना गायकवाड यांनी उपस्थित राहून आशीर्वाद दिले.

# २४ तास सुरु राहणार दुकाने व आस्थापने महेश गुप्ता यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** भारतीय जनता पार्टी व्यापारी आघाडी - पुणे शहरचे अध्यक्ष महेश गुप्ता यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले असून, पुणे शहरातील व्यापारी वर्गाच्या विविध प्रश्नांबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. यामुळे व्यापाऱ्यांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दूर होण्यास मदत होणार आहे.



यासंदर्भात पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली व्यापारी संघटनांची विशेष समन्वय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला सह पोलीस आयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त तेजस्वी सातपुते, महेश गुप्ता तसेच विविध व्यापारी संघटनांचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत दुकाने व आस्थापनांच्या वेळांबाबत निर्माण झालेला संभ्रम, शहरातील विविध भागांमध्ये नियमांची होत असलेली वेगवेगळी अंमलबजावणी, व्यापाऱ्यांशी सन्मानपूर्वक वर्तन तसेच व्यापारी आणि पोलिस प्रशासन यांच्यातील समन्वय वाढविण्याच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट केले की, सर्व अधिकृत व परवानाधारक दुकाने आणि आस्थापने यांना कायद्यानुसार २४ तास व्यवसाय सुरू ठेवण्याची परवानगी आहे. तसेच टपऱ्या, हातगाडी व्यावसायिक, फेरीवाले, पानटपऱ्या आणि तत्सम व्यवसायांना रात्री १० वाजेपर्यंत व्यवसाय करण्यास परवानगी असल्याचे त्यांनी सांगितले. या स्पष्टीकरणामुळे व्यापारी वर्गातील संभ्रम दूर झाला असून, नियमांबाबत अधिक स्पष्टता निर्माण झाली आहे.

याशिवाय व्यापाऱ्यांच्या तक्रारी, सूचना आणि समस्यांचे जलद निवारण व्हावे यासाठी स्वतंत्र नोडल ऑफिसर नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे व्यापारी आणि पोलिस प्रशासन यांच्यात थेट संवादाची प्रभावी यंत्रणा निर्माण होणार असून, व्यापाऱ्यांच्या प्रश्नांचे निराकरण अधिक वेगाने होण्यास मदत होणार आहे.

व्यापारी वर्गासाठी स्वतंत्र नोडल ऑफिसर नियुक्त करण्याची मागणी आणि त्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यामध्ये महेश गुप्ता यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यामुळे व्यापारी संघटनांनी या निर्णयाचे स्वागत करत पोलीस प्रशासनाचे आभार मानले.

या बैठकीमुळे पुणे शहरातील व्यापारी वर्ग आणि पोलिस प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक मजबूत होऊन व्यापारी हिताच्या प्रश्नांना गती मिळेल, असा विश्वास महेश गुप्ता यांनी व्यक्त केला.

द•ख•ल

## राक्षी येथे देवा भाऊ प्रीमियर लीग २०२६ चे आयोजन

**शेवगाव :** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावरील प्रेम, प्रेरणा आणि आदरातून देवा भाऊ प्रीमियर लीग २०२६ या भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन राक्षी ता . शेवगाव येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेचा खेळाडू लिलाव (ऑक्शन) सोहळा दिनांक ३१ मे २०२६ रोजी श्री ढाकणे शैक्षणिक संकुल, राक्षी येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या ऑक्शनमध्ये सहभागी झालेल्या सर्व संघमालक, खेळाडू आणि क्रिकेटप्रेमींनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्पर्धेच्या यशस्वी वाटचालीची नांदी दिली. विशेष म्हणजे, या स्पर्धेमध्ये १२ संघांनी प्रवेश घेतला असून, तालुक्यातील आणि परिसरातील नामांकित खेळाडू या स्पर्धेत आपले कौशल्य दाखविणार आहेत. स्पर्धेचे उद्घाटन व पहिला सामना दिनांक ११ जून २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या भव्य उद्घाटन सोहळ्यासाठी परिसरातील मान्यवर, क्रीडाप्रेमी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. राक्षी गावचे विद्यमान सरपंच, माजी सरपंच, ग्रामपंचायत पदाधिकारी, मित्रमंडळ, ग्रामस्थ, सहकारी आणि राक्षी क्रिकेट क्लबच्या सर्व सदस्यांच्या अथक परिश्रमामुळे ही स्पर्धा भव्य स्वरूपात साकार होत असून गावचे उपसरपंच अतुल जुंबड हे या स्पर्धचे मुख्य आयोजक आहेत.

## विद्यालयाच्या प्राचार्यपदाचे पदग्रहण वटवृक्षरोपणाने



**शेवगाव :** पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे.प्रत्येकाने एक तरी झाड लावावे.वृक्षरोपणा बरोबरच वृक्ष संवर्धनाची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारावी असे प्रतिपादन प्राचार्य संपत दसपुते यांनी केले . जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून विद्यालयात वटवृक्षरोपण करण्यात आले. कार्यक्रमप्रसंगी उपमुख्याध्यापक सुनील जायभाये,पर्यवेक्षक संजय दुधाडे, नानासाहेब थोटे, गणेश तेलोरे, विठ्ठल भिसे, मीना बटुळे आदी मान्यवर उपस्थित होते प्रथमत: नवनियुक्त प्राचार्य संपत दसपुते,उपमुख्याध्यापक सुनील जायभाये, पर्यवक्षक संजय दुधाडे यांचा सत्कार शिक्षक व पालक यांच्या हस्ते संपन्न झाला . त्यानंतर क्रीडांगण परिसरात मान्यवरांच्या हस्ते पाच वटवृक्ष लावण्यात आले . प्राचार्य संपत दसपुते पुढे म्हणाले की, वृक्ष हे पर्यावरणाचे संतुलन राखण्यास, प्रदूषण कमी करण्यात तसेच भावी पिढ्यांना शुद्ध हवा व निरोगी जीवन देण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात.प्रत्येक विद्यार्थ्यांनी 'वृक्ष संवर्धनाची जबाबदारी स्वीकारावी असा मौलिक संदेश त्यांनी .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सर्जेराव निकाळजे यांनी केले तर आभार ज्ञानेश्वर तहकीक यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंदांचे सहकार्य लाभले.

## पोपटराव माने यांची कांदा उत्पादक शेतकरी संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी निवड

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुका कांदा उत्पादक शेतकरी संघटनेच्या तालुका अध्यक्षपदी लिंपणगाव येथील शेंडेवाडीचे. शेतकरी सुपुत्र पोपट संभाजी माने यांची तालुका अध्यक्षपदी नुकतीच निवड झाली



आहे. महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी ही निवड जाहीर केली आहे. यापुढे श्री दिघोळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नाशिक जिल्हाध्यक्ष तथा राज्य कोअर कमिटी सदस्य जयदीप भदाणे यांच्या नेतृत्वाखाली कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी व त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे श्री माने यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले. कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न मांडणे, संघटना विस्ताराला गती देणे, तसेच शेतकरी हितासाठी संघटनेच्या माध्यमातून कार्य जोमात करणे ही महत्त्वपूर्ण जबाबदारी श्री माने यांच्यावर सोपवली असल्याचे जिल्हाध्यक्ष जयदीप भदाणे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. श्री पोपट माने यांची तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांचे शेतकरी वर्गातून सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## ...अन्यथा मनुष्याला भयावह संकट : आव्हाड



**पाथर्डी :** निसर्गाचे संवर्धन झाले, पर्यावरणाचा समतोल राखला गेला तरच ही पृथ्वी वाचेल अन्यथा भविष्यात मनुष्याला दुष्काळ, प्रदुषण, वाढते तापमान या भयावह संकटांना सामोरे जावे लागेल. प्रत्येक नागरिकाने दरवर्षी किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा. वृक्ष केवळ ऑक्सिजन देत नाहीत, तर भावी पिढ्यांसाठी समृद्ध आणि निरोगी पर्यावरण निर्माण करतात. निसर्ग संवर्धन करणे हे प्रत्येकाची जबाबदारी आहे. असे प्रतिपादन नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पाथर्डी नगरपरिषद व वन विभागाच्या संयुक्त विद्यमाने शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील एडके कॉलनी परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, नगरसेवक प्रतिक भैय्या नांगरे तथा वनपरिक्षेत्र अधिकारी मिलिंद गोवेकर यांच्या हस्ते विविध देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी जेष्ठ नगरसेवक नंदकुमार शेळके, माजी उपनगराध्यक्षा मनीषा उदमले, नगरसेवक संजय देशमुख, सभापती बंडूशेठ बोरुडे, वंदना टेके, सुभाष बोरुडे, संदीप पवार, सिंधू साठे, संतोष एडके, वनविभागाचे बबन मंचरे, विजय पालवे, आप्पासाहेब घनवट यांच्यासह अनेक मान्यवर व प्रभागातील नागरीक उपस्थित होते. प्रभागातील रस्त्याच्या दुतर्फा तसेच मोकळ्या जागेवर वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पाथर्डीचे वन परिक्षेत्र अधिकारी गोवेकर यांनी ही उपस्थितांना मार्गदर्शन करत वृक्षारोपण, निसर्ग संवर्धन व पर्यावरण यांचे महत्त्व पटवून दिले. नगरसेविका मनीषा उदमले यांनी स्वागत केले तर नगरसेवक प्रतिक नांगरे यांनी आभार मानले.

# कर्जत पोलिसांचा कॅफेवर छापा

### दोन जोडपे आढळली ; कॅफेचालकांवर गुन्हा दाखल




प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** कर्जत शहरातील मराठी कॅफे येथे नूतन पोलीस निरीक्षक हनुमंत गायकवाड यांनी पथकासह छापा टाकला. यात दोन जोडपे मिळून आले. तरुण मुला-मुलींना अश्लील हवभाव अथवा कृत्य करण्यास सुलभ व्हावे यासाठी जागा उपलब्ध करून देत त्या बदल्यात प्रत्येक तासाप्रमाणे पैसे आकारले जात म्हणून कॅफे चालक रोहित अशोक होले याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शनिवार, दि ६ जून रोजी संध्याकाळी ७ वाजता कर्जतचे नूतन पोलीस निरीक्षक हनुमंत गायकवाड शहरात पेट्रोलिंग करीत असताना काळदाते कॉम्प्लेक्समध्ये मराठी कॅफे येथे जोडप्यास तसेच तरुण मुला-मुलींना अश्लील हवभाव अथवा कृत्य करण्यास सुलभ व्हावे यासाठी जागा उपलब्ध करून देत त्या बदल्यात प्रत्येक तासाप्रमाणे पैसे आकारले जाते. यासह विनापरवाना खाद्यग्रहांमधून खाद्यपदार्थांची विक्री करीत असल्याची माहिती मिळाली. पोलीस निरीक्षक गायकवाड यांनी आपला फौजफाटा सदरच्या कॅफेकडे वळवले असता त्यांना दोन जोडपे मिळून आले. यावेळी मिळून आलेले जोडप्यांना समज देत त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. कॅफे चालक असणाऱ्या रोहित अशोक होले (वय २६ वर्ष रा. लोणी मसदपूर ता. कर्जत) याच्या विरोधात कर्जत पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३३ एक्स अ १३१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. नूतन पोलीस निरीक्षक हनुमंत गायकवाड यांनी कर्जतचा पदभार घेतल्यापासून अवैध धंद्याविरोधात मोहीम हाती घेतली असून सर्वसामान्य नागरिकांनी आपल्या परिसरात अवैध व्यवसाय सुरू असल्यास विना संकोच तक्रार करावी. तक्रारदाराचे नाव गुपित ठेवण्यात येईल अशी ग्वाही दिली.

**आपले पाल्य काय करतात? कुठे जातात याकडे पालकांनी लक्ष देण्याची गरज**

सोशल मीडियाचे व्यसन तसेच पाश्चात्य संस्कृतीच्या आहारी सध्या तरुणाई जात असून याकडे पालकांनी सतर्क असणे आवश्यक आहे. आपले पाल्य कुठे जातात ? काय करतात. त्यांच्या संगती कोण-कोण असते याकडे पालकांनी लक्ष देणे आवश्यक आहे. मुलांनी देखील आपल्या कुटुंबाच्या कष्टाची जाणीव ठेवावी. करियरकडे लक्ष देत आपला विकास साधावा असे आवाहन पोलीस निरीक्षक गायकवाड यांनी केले.

## उपलब्ध पाण्याचा जपून वापर करावा

### तालुका प्रशासनाकडून आवाहन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** कुकडी आवर्तनातून कर्जत तालुक्यातील एकूण २५ तलावात पाणी सोडण्यात आले असून या उपलब्ध पाण्याचा वापर सर्वसामान्य नागरिकांनी काटकसरीने करावा. तसेच सोडण्यात आलेल्या पाण्याचा कोणी ही अवैध उपसा करू नये असे आवाहन तालुका प्रशासनाकडून प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी केले आहे.

सध्या कर्जत तालुक्यात कुकडीचे आवर्तन सुटलेले असून सर्वसामान्य नागरिकांच्या मागणीनुसार कर्जत तालुक्यातील एकूण २५ तलाव, बंधारे यासह ओढ्यात सोडलेले असून या उपलब्ध पाण्याचा वापर फक्त पिण्यासाठी करावा असे आवाहन तालुका प्रशासनाकडून करण्यात आले आहे. कर्जत तालुक्यातील चिलवडी, देशमुखवाडी, बेनवडी, कोळवडी, चापडगाव, चापडगाव गावठाण विहीर लगत बंधारा, गलांडवाडी पाझर तलाव, लोणी मसदपूर बंधारा, कोरेगाव, पाटेवाडी पाझर तलाव, धांडेवाडी बंधारा, नेटकेळवाडी, कोरेगाव, बजरंगवाडी, खातगाव बंधारा, लोणी मसदपूर पाणी पुरवठा विहीर लागत बंधारा (नदी), कर्जत शहर लगत बंधारा, आंबीजळगाव,अळसुंदा, माळंगी, डोंबाळवाडी, शेगुड, थेरवडी, दूरगाव पाझर तलाव आणि पळस-ओढा अशा जवळपास २५ पाझर तलाव, बंधारे आणि ओढ्यात मागणीनुसार पाणी सोडण्यात आले.

## कांद्याला हमीभाव व कर्जमाफीसाठी श्रीगोंद्यात ट्रॅक्टर रॅली

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** कांद्याला भाव नाही, शेतकरी मात्र भरडला जातोय, अशी संतप्त भावना व्यक्त करत श्रीगोंदा तालुका काँग्रेस कमिटी व युवक काँग्रेसच्या वतीने सोमवार, दि. ८ जून रोजी भव्य ट्रॅक्टर रॅली आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना किमान २५ प्रति किलो हमीभाव मिळावा, फसवी कर्जमाफी रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना न्याय द्यावा आणि शासनाच्या संबंधित आदेशात तातडीने फेरबदल करावेत, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन होणार आहे.

सकाळी १० वाजता कृषी उत्पन्न बाजार समिती येथून ट्रॅक्टर रॅलीला सुरुवात होणार असून तहसील कार्यालयावर मोर्चाचा समारोप होणार आहे.

यावेळी शासनाच्या शेतकरीविरोधी धोरणांचा निषेध नोंदवत संबंधित आदेशाची प्रतीकात्मक होळी करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.सध्या कांद्याच्या घसरलेल्या दरामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून उत्पादन खर्चही निघत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. शासन फक्त घोषणा करते; पण शेतकऱ्यांच्या बांधावर न्याय पोहोचत नाही, असा आरोप काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केला आहे.या आंदोलनात तालुक्यातील शेतकरी, युवक, कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन काँग्रेस व युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आले आहे. ट्रॅक्टरचा आवाज आता थेट शासनाच्या दारात पोहोचणार, अशी चर्चा तालुक्यात रंगू लागली आहे.

## देवस्थान समितीची शेवगावला बैठक



**शेवगाव :** राज्याचे महसूलमंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर येथे 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप २०२६' हा प्रस्तावित कायदा स्थगित करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. या मंदिरहितैषी निर्णयाचे महाराष्ट्र मंदिर महासंघाने स्वागत केले असून, राज्यभरातील मंदिर विश्वस्तांच्या संघटित प्रयत्नांना मिळालेले हे मोठे यश असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. शेवगाव येथील शनि मारुती मंदिर येथे मंदिरात सायंकाळी साडेसहा वाजता आयोजित देवस्थान समितीच्या विश्वस्त व ट्रस्टींच्या बैठकीत महाराष्ट्र मंदिर महासंघाचे संघटक सुनील घनवट अध्यक्षपदावरून बोलत होते.

यावेळी बोलताना घनवट म्हणाले की, या कायद्याच्या संदर्भात राज्यभर मंदिर विश्वस्तांच्या बैठका, निवेदने, हरकती-सूचना, पत्रकार परिषद तसेच देवस्थान भूमी संरक्षण परिषदांच्या माध्यमातून शासनासमोर मंदिरांची बाजू प्रभावीपणे मांडण्यात आली. महाराष्ट्र मंदिर महासंघ, अष्टविनायक मंदिर समिती, विश्व हिंदू परिषद आणि राज्यातील सर्व मंदिर विश्वस्त यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे शासनाने हा सकारात्मक निर्णय घेतला आहे.

# देशी दारू दुकानाला ठोकले टाळे मात्र दुसऱ्याच दिवशी भाव चढे!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री




**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील मुंगी येथील शासन मान्य देशी दारूचे दुकान हे गेली अनेक महिन्यापासून पैठण - पंढरपूर महामार्गालगतच आठवडे बाजार भरत असलेल्या शासकीय जागेत सुरू असून ते तेथून स्थलांतरित व्हावे म्हणून ग्रामस्थानी कुलूप ठोकले मात्र कुलूप ठोकताच गावातच अवैध दारू विक्री करणाऱ्यांनी आपल्या विक्रीमध्ये मोठी भाव वाढ केली असल्याने आता त्याचा बंदोबस्त कोण करणार असा प्रश्न गावातीलच जानकार नागरिकांतून होताना ऐकावयास मिळत आहे. गावातील तरुणांमध्ये दिवसे - दिवस वाढत असलेले व्यसन व त्यातून दररोज अनेक कुटुंबामध्ये होणाऱ्या हाणामाऱ्या पाहता ग्रामस्थानी ग्रामसभेत निर्णय घेऊन ऐन बाजारतळावर शासकीय जागेत असलेल्या या दुकानामुळे बाजारकरूना व विशेष करून महिला वर्गाना त्याचा होणारा त्रास थांबावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन शासन मान्य असणारे देशी दारूचे दुकान तेथून हलवावे असा पवित्रा घेऊन ग्रामसभेस उपस्थित असणाऱ्या असंख्य ग्रामस्थानी जाऊन त्या दुकानाला कुलूप ठोकले मात्र कुलूप ठोकल्यानंतर गावातच राज्य उत्पादन शुल्क व पोलिसांच्या आशीर्वादाने सुरू असलेल्या अवैध दारू विक्री करणारानी आपल्या विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणात भाव वाढ केली असल्याने दररोज दारू पिणाऱ्या तळीरामांच्या खिशाला कात्री लागली असून आता ग्रामस्थानी शासन मान्य दारू दुकान बंद केले परंतु अवैध विक्री करणाऱ्यावर कोण कारवाई करणार की अशीच परस्थिती राहणार असा खडा सवाल गावातीलच असंख्य जानकार नागरिक करत असतानाचे चित्र दिसून येत असून ऐकावयासही मिळत आहे.

## सर्पदंशाने श्रीगोंदा सोसायटीच्या मंदाकिनी वडवकरांचे निधन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



विषारी नागाचेही दहन

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा शहर व परिसरात रविवारी रात्री घडलेल्या दुर्दैवी घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. श्रीगोंदा विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी मर्यादितच्या माजी व्हा. चेअरमन तथा विद्यमान संचालक कै. मंदाकिनी सूर्यकांत वडवकर यांचे सर्पदंशामुळे दु:खद निधन झाले. या घटनेमुळे सहकार क्षेत्रासह संपूर्ण तालुक्यावर शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी वेळू रोडवर वडवकरवस्ती येथे रात्री त्यांना विषारी नागाने दंश केला. त्यानंतर तातडीने उपचारासाठी धावपळ करण्यात आली. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली होती. विशेष म्हणजे, नागाने दंश केल्यावर त्यांनी आरडाओरडा केल्यावर शेजारीच खाटेवर झोपलेल्या त्याचे पती सूर्यकांत यांनी उठून पाहिले असता नाग जाताना दिसला तो पडवीत असलेल्या गोण्याखाली शिरला त्यामुळे घटनास्थळी भीती आणि कुतूहलाचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेला आणखी भावनिक वळण देणारी बाब म्हणजे, अंत्यसंस्कारावेळी सर्पदंश करणाऱ्या त्या नागाचेही मयत मंदाकिनी वडवकर यांच्या शेजारी दहन करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेची परिसरात दिवसभर चर्चा सुरू होती. कै. मंदाकिनी वडवकर यांनी सहकार क्षेत्रात सक्रिय भूमिका बजावत अनेक सामाजिक उपक्रमांत सहभाग घेतला होता. शांत स्वभाव, सर्वसामान्यांशी जिव्हाळ्याचे संबंध आणि संस्थेप्रती असलेली निष्ठा यामुळे त्या परिचित होत्या. त्यांच्या अकाली निधनामुळे सहकार क्षेत्राची मोठी हानी झाल्याची भावना व्यक्त होत आहे.त्यांच्या पश्चात पती श्री. सूर्यकांत (मिठू) वडवकर, दोन विवाहित मुली,पुत्र श्री. संदीप (सोन्या) सूर्यकांत वडवकर व परिवार असा मोठा परिवार आहे.कै. मंदाकिनी वडवकर यांना विविध स्तरांतून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात येत आहे.

## १६०० विवाह जुळविणाऱ्या ढवळेंचा गौरव



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** समाजातील विवाह समस्यांवर सकारात्मक मार्ग काढत १६०० हून अधिक विवाह यशस्वीरित्या जुळविणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते सुभाष ढवळे यांचा विविध संस्थांच्या वतीने गौरव करण्यात आला. वधू-वर सूचक मंडळाच्या माध्यमातून त्यांनी हजारो कुटुंबांना एकत्र आणून अनेक संसार फुलविण्याचे कार्य केले आहे.

त्यांच्या या सेवाभावी कार्याची दखल घेत प्रहार दिव्यांग संघटना व जय मल्हार फाउंडेशनच्या वतीने त्यांना राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार प्रदान करण्यात आला. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्यासह विविध मान्यवरांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

# सुपा परिसरात पर्जन्याकडे लागल्या शेतकऱ्यांच्या नजरा!

### पावसाअभावी शेतीसह दुग्ध व्यवसायही संकटात

विशाल फटांगडे । राष्ट्र सह्याद्री

**सुपा :** सुपा परिसरासह पारनेर तालुक्यातील शेतकरी सध्या आकाशाकडे डोळे लावून बसले आहेत. जून महिन्याचा पहिला आठवडा संपत आला असूनही अद्याप दमदार पावसाची सुरुवात झालेली नाही. त्यामुळे खरीप हंगामाच्या तयारीवर परिणाम होत असून शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

मागील वर्षी १८ मे रोजीच परिसरात दमदार पावसाने हजेरी लावली होती. त्यानंतर अनेक शेतकऱ्यांनी शेतीची मशागत, खतांची खरेदी तसेच खरीप पिकांच्या नियोजनाला सुरुवात केली होती. मात्र यंदा ७ जून उजाडूनही पावसाचा ठोस पत्ता नसल्याने शेतकऱ्यांची प्रतीक्षा वाढत आहे.

सुपा परिसरातील बहुतांश शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. पाऊस लांबल्यास बाजरी, मका, सोयाबीन, मूग, उडीद तसेच इतर खरीप पिकांच्या पेरण्या उशिरा होण्याची शक्यता आहे. अनेक शेतकऱ्यांनी शेतांची मशागत पूर्ण केली असून बी-बियाणे व खते खरेदी करून ठेवली आहेत. मात्र पावसाअभावी पेरणीचे काम खोळंबले आहे. यंदा पावसाला आणखी काही दिवस विलंब झाल्यास शेतीसोबतच दुग्ध व्यवसायालाही मोठा फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आधीच हिरव्या चाऱ्याचा तुटवडा जाणवत असून जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनत चालला आहे. अनेक शेतकरी व पशुपालकांना चारा आणि पाण्यासाठी अतिरिक्त खर्च करावा लागत आहे.



परिसरातील काही गावांमध्ये विहिरी, कूपनलिका आणि पाणीसाठे तळाला गेल्याने पशुपालकांना टँकरच्या माध्यमातून जनावरांसाठी पाणीपुरवठा करावा लागत आहे. त्यामुळे दुग्ध व्यवसायाचा उत्पादन खर्च वाढत असून पशुपालक आर्थिक अडचणीत सापडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. वेळेत पाऊस न झाल्यास चाऱ्याची टंचाई अधिक तीव्र होऊन त्याचा थेट परिणाम दूध उत्पादनावर होण्याची शक्यता आहे.

गेल्या काही दिवसांपासून वातावरणात उकाडा वाढला असून अधूनमधून ढगाळ वातावरण निर्माण होत आहे. मात्र अपेक्षित पाऊस पडत नसल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. ग्रामीण भागात पावसाविषयी चर्चा रंगत असून कधी बरसणार पाऊस? हा प्रश्न सर्वसामान्यांपासून शेतकऱ्यांपर्यंत प्रत्येकाच्या तोंडी आहे.

दरम्यान, हवामान विभागाने मान्सूनच्या प्रगतीबाबत सकारात्मक संकेत दिले असले तरी प्रत्यक्ष पावसाची सुरुवात कधी होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. वेळेत आणि समाधानकारक पाऊस झाल्यास खरीप हंगामाला गती मिळणार असून शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पालवतील. सध्या मात्र सुपा परिसरातील शेतकरी, पशुपालक, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिक पर्जन्यराजाच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

**दुग्ध व्यवसायासमोरही संकट**

सुपा परिसरातील अनेक गावांमध्ये जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. काही ठिकाणी पशुपालकांना टँकरद्वारे पाणी आणावे लागत असून हिरव्या चाऱ्याचाही तुटवडा जाणवत आहे. आणखी काही दिवस पाऊस लांबल्यास दुग्ध व्यवसाय अडचणीत येण्याची शक्यता असून दूध उत्पादनावर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो.

**आठ दिवसांत पाऊस न झाल्यास दुग्ध व्यवसाय संकटात**

दुग्ध व्यवसायासाठी लागणारा मुरघास (सायलेज) सध्या अत्यंत कमी प्रमाणात शिल्लक आहे. आगामी आठ दिवसांत समाधानकारक पाऊस झाला नाही तर पशुपालकांना मुरघास जादा दराने विकत घ्यावा लागेल. त्यामुळे दुध उत्पादनाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढणार असून अनेक लहान-मोठे पशुपालक आर्थिक संकटात सापडतील. परिणामी दुग्ध व्यवसाय मोडकळीस येण्याची भीती आहे. याशिवाय परिसरातील बहुतांश बोअरवेल व विहिरींमधील पाणीसाठा अत्यंत कमी झाला असून जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनत आहे.

– सुदाम मगर
दुग्ध व्यवसायिक तथा माजी चेअरमन,
पळवे बु. विविध कार्यकारी सोसायटी

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

सोमवार दि.८ जून २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

# नेवासा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचा तीस टन कांदा दुबईला




नेवासा मार्केट कमिटीच्या आवारातून रविवारी कंटनेरद्वारे दुबईला कांदा रवाना करण्यात आला.यावेळी सभापती नंदकुमार पाटील,संचालक अरुण शिंदे,राजेंद्र सानप,सुनील धायजे,कांदा व्यापारी अर्जुन पंडित,दीपक नाबदे आदी दिसत आहे **(छाया-सुधीर चव्हाण नेवासा)**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : जेष्ठ नेते यशवंतराव गडाख यांच्या प्रेरणेने व माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या पुढाकाराने नेवासा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात सुरू झालेल्या कांदा मार्केटला शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून चांगल्या क्वालिटीचा कांदा ही उपलब्ध होत असल्याने येथील हरिओम एंटरप्राइजेस च्या मार्फत रविवारी सुमारे तीस टन कांदा हा कंटेनरद्वारे दुबईला रवाना करण्यात आला.

हरिओम एंटरप्राइजेसच्या वतीने दुबईला निघालेल्या कांद्याच्या पहिल्या कंटेनरचे पूजन नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.

यावेळी कांदा व्यापारी हरिओम एंटरप्राइजेसचे अर्जुन पंडित व दीपक नाबदे अर्जुन वाबळे यांच्या वतीने सभापती नंदकुमार पाटील, संचालक अरुण शिंदे,राजेंद्र सानप,सुनील धायजे, नगरसेवक संभाजीराव धोत्रे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी बोलतांना मार्केट कमिटीचे सभापती नंदकुमार पाटील म्हणाले की माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या पुढाकाराने नेवासा येथे कांदा मार्केट सुरू झाल्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या कांद्याला चांगला भाव येथे मिळत आहे,कांदा मार्केट मध्ये चांगल्या क्वालिटीचा कांदा उपलब्ध होत असल्याने परदेशातून त्याला चांगली मागणी होत आहे,कांदा उत्पादकांनी नेवासा मार्केट कमिटीलाच आपला कांदा घालावा यासाठी चांगला भाव देण्याचा प्रयत्न आमचे संचालक मंडळ करेल अशी ग्वाही यावेळी बोलतांना दिली.

नेवासा बाजार समिती आवारातील गाळा नंबर १६ मधील हरिओम एंटरप्राइजेसचे कांदा निर्यातदार व्यापारी अर्जुन पंडित म्हणाले की माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या माध्यमातून एक महिन्यापूर्वी येथे कांदा मार्केट सुरू करण्यात आले.नेवासा मार्केटच्या माध्यमातून कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव देण्यासाठी मार्केट कमिटीचे सभापती नंदकुमार पाटील व त्यांचे सर्व संचालक मंडळ प्रयत्न करत आहे,कांदा मार्केट ला चांगल्या क्वालिटीचा कांदा उपलब्ध होत असल्याने आम्हाला देखील परदेशातून मागणी होत असल्याने आज प्रथमच या मार्केट मधून १२०० गोण्या सुमारे तीस टन कांदा येथून मुंबई व तेथून दुबईला जहाजाद्वारे रवाना होणार असल्याचे सांगितले.कांदा व्यापारी दीपक नाबदे यांनी उपस्थित कामगारांना पेढे वाटून उपस्थितांचे आभार मानले.

### येत्या रविवारी ही कांदा खरेदी सुरू रहाणार -सभापती नंदकुमार पाटील

नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे मार्गदर्शक माजी मंत्री शकरराव गडाख यांच्या पुढाकाराने नेवासा येथील मार्केट कमिटीच्या आवारात दि.६ मे पासून कांदा खरेदी सुरू करण्यात आली.दर मंगळवार व गुरुवारी होणाऱ्या कांदा खरेदी विक्रीला उत्स्फूर्त प्रतिसाद पहाता आता रविवारी ही शेतकऱ्यांच्या मागणीनुसार कांदा खरेदी सुरू करण्यात येणार असल्याचे सभापती नंदकुमार पाटील यांनी यावेळी बोलतांना जाहीर केले

# जनता दरबारातून मंत्री विखे पाटलांचा 'जनसेवेचा'धडाका!

## वीज, पाणी आणि रस्ते प्रश्नावर तात्काळ कारवाईचे अधिकाऱ्यांना आदेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**झरेकाठी** : जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी जनता दरबाराच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. आलेल्या प्रत्येक अर्जाचे गांभीर्य लक्षात घेऊन निर्धारित वेळेत कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी सर्वच विभागांच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

मंत्री विखे पाटील महिन्यातून एकदा जनता दरबाराचे आयोजन करून जिल्ह्यासह राज्यातील नागरिकांचे प्रश्न समजावून घेतात. रविवारी (दि. ७) प्रवरानगर येथील डॉ. धनंजयराव गाडगीळ सभागृहात मंत्री विखे पाटील यांनी आलेल्या सर्वच नागरिकांशी संवाद साधून त्यांची निवेदने स्वीकारली. रस्ते, पाणी, वीज, शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात येत असलेल्या अडचणी त्यांनी समजावून घेतल्या. प्राप्त झालेल्या काही अर्जांवर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. प्राप्त झालेले सर्व अर्ज संबंधित विभागाच्या कार्यालयात पाठविण्यात येणार आहेत. अर्जावर आठवडाभरात कार्यवाही करून त्याचा अहवाल माझ्या कार्यालयाकडे सादर करण्याच्या सूचना मंत्री विखे पाटील यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. प्रामुख्याने वीज वितरण कंपनीच्या संदर्भात असलेल्या समस्यांबाबत मंत्री विखे पाटील यांनी गांभीर्याने लक्ष देण्याचे निर्देश वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.

ग्रामीण भागातील रस्त्यांच्या प्रश्नांसंदर्भात ग्रामस्थांना विश्वासात घेऊन याबाबतचे निर्णय करावेत असे सूचित करून, मंत्री विखे पाटील म्हणाले की, जिल्ह्यातील रस्त्यांच्या कामांचा आढावा आपण लवकरच घेणार असून, आगामी पावसाळ्याचे दिवस लक्षात घेता नागरिकांची गैरसोय होणार नाही याची दक्षताही घेण्याबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले. सद्यपरिस्थितीत उन्हाची तीव्रता वाढलेलीच आहे, ज्या गावांना टॅंकरची मागणी आहे अशा गावांना टॅंकरद्वारे पाणी उपलब्ध करून देण्याबाबत अधिकाऱ्यांनी संवेदनशीलतेने कार्यवाही करावी, असे निर्देश दिले. डॉ. धनंजयराव गाडगीळ सभागृहामध्ये मंत्री विखे पाटील यांनी प्रत्येक गावातून आलेल्या शिष्टमंडळाला स्वतंत्र वेळ देऊन गावनिहाय प्रश्न समजावून घेतले. व्यक्तिगत अडचणी असलेल्या नागरिकांची निवेदने स्वीकारत त्यांनी याबाबत तातडीने निर्णय करण्याबाबतही आश्वासित केले. प्रामुख्याने नोकरीच्या संदर्भातील प्राप्त झालेल्या अर्जांबाबत जिल्हास्तरावर धोरणात्मक निर्णय करण्यात येणार असून, सद्यपरिस्थितीत सुरू असलेल्या उद्योजकांकडे त्यांच्या मागणीप्रमाणे सर्व उमेदवारांच्या शिफारशी करण्यात येतील. औद्योगिक क्षेत्राला आवश्यक असलेले मनुष्यबळ उपलब्ध व्हावे म्हणून कौशल्य प्रशिक्षण घेण्याबाबतही त्यांनी आलेल्या युवकांना सूचित केले.

जनता दरबारास श्रीरामपूर, राहाता, संगमनेर तसेच जिल्हास्तरावरील सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मराठा आरक्षणाच्या प्रश्नांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी केलेल्या पाठपुराव्याबद्दल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी झरेकाठी येथील जनसेवा युवा मंचाच्या सदस्य यांनी झरेकाठी येथे स्थानिक विकास निधीतून सी . सी .टी .व्ही .कॅमेरेसाठी निधी मिळण्यासाठी एक निवेदन देण्यात आले तसेच संगमनेर तालुक्यातील नान्नज दुमाला येथील आदिवासी महिलांनी दारूबंदी करण्यासाठी एक निवेदन दिली याप्रसंगी कविताताई पाटील यांच्या पुढाकाराने हे निवेदन देण्यात आले होती.

# रस्ता खोदल्याच्या कारणावरून दोन भावांना मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : रस्ता खोदल्याचा जाब विचारला असता आरोपींनी दोघा भावांना शिवीगाळ करुन लाकडी काठी व लाथा बूक्क्यांनी मारहाण केल्याची घटना दि. ३ जून रोजी दुपारी राहुरी तालुक्यातील माळेवाडी डुकरेवाडी गावचे शिवारात घडली. अक्षय बापुसाहेब सिनारे, (वय २७ वर्षे, रा. माळेवाडी डुकरेवाडी, ता. राहुरी), यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, अक्षय सिनारे यांची माळेवाडी डुकरेवाडी गावचे शिवारात शेत जमीन आहे.

सदर शेत जमीनीमध्येच त्यांचे घर आहे. घराकडे व शेताकडे जाण्यासाठी अजित सुरेश पाटील व बाळासाहेब शंकर डुकरे या दोघांचे शेताचे मधुन पुर्वीपासुन रस्ता आहे. दि. ३ जून २०२६ रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास अक्षय सिनारे व त्यांचा चुलत भाऊ सत्यम राजेंद्र सिनारे हे दोघेजण शेतातुन घरी जाण्यासाठी निघाले. तेव्हा घराकडे जाणारा रस्ता खोदलेला दिसला. तेव्हा तेथे आरोपी उभे होते. तेव्हा सिनारे हे दोघे भाऊ आरोपींना म्हणाले की, तुम्ही रस्ता का खोदला आहे. तेव्हा आरोपी म्हणाले की, येथुन नवीन रस्ता करायचा आहे.

सिनारे म्हणाले की, आधी नवीन रस्ता करा व नंतर जुना रस्ता खोदा. असे म्हणाल्याचा राग आल्याने आरोपींनी सिनारे या दोघा भावांना शिवीगाळ करुन आम्ही आधी जुना रस्ता खोदनार, त्यानंतर नवीन रस्ता करणार, तुम्हाला काय करायचे करा, अधी धमकी दिली. त्यानंतर लाकडी काठी व लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. भांडणामध्ये अक्षय सिनारे यांची सोन्याची अंगठी कोठेतरी गहाळ झाली. अक्षय बापुसाहेब सिनारे यांच्या फिर्यादीवरून आरोपी बाळासाहेब शंकर डुकरे, अजित सुरेश पाटील, सुरेश पोपट पाटील, सर्व रा. माळेवाडी डुकरेवाडी, ता. राहुरी, तुषार खर्डे व त्याचे सोबत तीन अनोळखी इसम सर्व रा. कोल्हार खुर्द, ता. राहाता, अशा सात जणांवर शिवीगाळ व मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे करीत आहेत.

# राष्ट्रवादीकडून राज्यसभेसाठी राजेंद्र जैन यांना संधी

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा निर्णय; सुनील तटकरेंची घोषणा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई** : सुनेत्रा पवारांच्या रिक्त जागी राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेंद्र जैन यांना संधी मिळाली आहे. सुनील तटकरे यांनी घोषणा केली आहे. राजेंद्र जैन हे राष्ट्रवादी काँग्रेसमधील ज्येष्ठ नेते प्रफुल पटेल यांचे निकटवर्तीय आहेत. त्यांच्या नावाची घोषणा करण्यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीपूर्वी पक्षातील वरिष्ठ नेत्यांची बैठक पार पडली. मंत्री छगन भुजबळ यांच्या सातपुडा निवासस्थानी दिलीप वळसे पाटील, प्रफुल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ यांची बैठक पार पडली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून दिल्ली हायकमांडकडून आलेल्या निरोपाबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. राजेंद्र जैन हे राष्ट्रवादी काँग्रेसचे एक निष्ठावान नेते असून, पक्षाचे विदर्भातील महत्त्वाचे संघटक मानले जातात. प्रफुल पटेल यांचे निकटवर्तीय असून त्यांनी विविध जिल्ह्यांमध्ये पक्षाचे निरीक्षक म्हणूनही काम पाहिले आहे. यापूर्वी, ते विधानपरिषदेवर आमदार म्हणून निवडून आले होते. तर, गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले आहे.



दरम्यान, राष्ट्रवादी पक्षाच्या वरिष्ठ पातळीवरील नेत्यांमध्ये ते महत्त्वाचे मानले जातात. नुकत्याच झालेल्या राज्यसभा आणि विधानपरिषद निवडणुकीच्या वेळीही त्यांच्या नावाची पक्षाच्या कोअर कमिटीत प्रबळ दावेदार म्हणून चर्चा झाली होती. दुसरीकडे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेवर कोणाची वर्णी लागणार, यावरून जोरदार चर्चा रंगली होती.

ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, राष्ट्रवादीचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश अधिक यांच्यासह या जागेवर भाजप नेत्या नवनीत राणा यांना राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारी दिली जाणार अशी जोरदार चर्चा रंगली होती. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी ही चर्चा पूर्णपणे फेटाळून लावत नवनीत राणा हा विषय राष्ट्रवादीकडून संपला आहे, असे स्पष्ट केले होते. रोहित पवार यांनी केलेल्या टीकेलाही त्यांनी प्रत्युत्तर दिले. दरम्यान, या सर्व घडामोडींवर शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी अजित पवार गटावर निशाणा साधला होता.

रोहित पवार म्हणाले होते की, या जागेवरून छगन भुजबळ यांना संधी दिली पाहिजे. भाजप विचाराधीन किंवा भाजपच्या व्यक्तीला सुनेत्रा पवारांची जागा आहे, ती दिली गेली तर पूर्ण राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भाजपच्या चरणी गेला असं म्हणावं लागेल, किंवा तो दिल्लीसमोर झुकलेला आहे, असा संदेश जाईल. रोहित पवारांच्या या सल्ल्यावर सुनील तटकरे यांनी तीव्र शब्दांत पलटवार केला. आमच्या पक्षात आम्ही उमेदवारी कोणाला द्यावी याबाबत आम्हाला त्यांचा सल्ला घेण्याची पाळी आलेली नाही. त्यांनी त्यांच्या पक्षात पहिले सल्ले द्यावे. त्यांचे संख्याबळ कसे वाढेल यावर त्यांनी अधिक लक्ष केंद्रित करावे, असे सुनील तटकरे म्हणाले.

# नैऋत्य मान्सुन अद्यापही ब्रेक! जिल्ह्यात १५ जूनला आगमन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

लिंपणगाव : नैऋत्य मान्सून अद्यापही थांबलेला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात १५ ते २० जून दरम्यान मॉन्सून दाखल होईल, असा अंदाज जलसंपदा विभागाचे सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता तथा हवामान अभ्यासक उत्तमराव निर्मळ यांनी दिली. यावर्षीच्या मान्सुनची अडथळ्यांची शर्यत थांबता थांबेना. एल- निनो, एम.जे.ओ. आणि हिंदी महासागरातील द्विधृव स्थिती या मान्सुनवर परीणाम करणाऱ्या घटकांच्या प्रतिकुलतेमुळे हवामान खात्याने तसेच अन्य अधिकृत स्रोतांनी सुरवातीला वर्तवलेले अंदाज प्रत्यक्षात दिसले नाहीत. एल-निनो जुनमध्येच सक्रिय झाला असुन निनो ३.४ भागातील पॅसिफिक महासागरातील तापमान + ०.५ अंश सेल्सिअस या एल - निनो निर्मितीच्या सिमारेषेपर्यंत पोहचले आहे. एम. जे. ओ. सध्या ७ फेजमध्ये म्हणजे पश्चिम पॅसिफिक मध्ये असल्याने त्याचा जुन मध्ये लाभ होणे शक्य नाही. हिंदी महासागरातील द्विधृव स्थिती सध्या तटस्थ असुन पावसाळ्याच्या उत्तरार्धात म्हणजे ऑगस्ट - सप्टेंबर मध्ये तो सकारात्मक होईल. परंतु तोपर्यंत नैऋत्य मोसमी पाऊस संपत आलेला असतो.

अहिल्यानगरला नियमीत मान्सुन त्याच्या संभाव्य गतीनुसार १५ ते २० जुनच्या दरम्यान सुरु होईल. जूनच्या १५ तारखेपर्यंत स्थानिक पातळीवर कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होऊन ढगाळ वातावरण राहील. दुपारनंतर वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह मान्सूनपूर्व कमी वेळ टिकणारा धुंवाधार पाऊस पडेल. जूनच्या पहिल्या दोन आठवड्यांत शेतीसाठी उपयुक्त अशा मोठ्या पावसाची शक्यता अत्यंत कमी आहे. अवकाळी पावसावर शेतीची मशागतीची कामे करता येतील. परंतु जोपर्यंत ७५ ते १०० मिमी (किमान ३ ते ४ इंच) चांगला पाऊस पडत नाही आणि जमिनीमध्ये ५ ते ६ इंच खोलीपर्यंत ओलावा जात नाही, तोपर्यंत खरिपाची पेरणी करू नये. कारण यावर्षी सरासरीच्या जवळपास ९० टक्के म्हणजे कमी पाऊस होणार असुन भुजलपातळीत समाधानकारक वाढ होणार नाही.

२०१५ मध्ये ८७ टक्के पाऊस झाल्याने दुष्काळ सदृश्य स्थिती निर्माण झाली होती. यावर्षी जवळपास तिच स्थिती असेल असे सध्याचे चित्र आहे. यावर्षी पडणारा कमी वेळात धुंवाधार आणि नंतर दिर्घकालीन खंड अशा स्वरुपाचा असल्याने पाण्याची कालवा वा तत्सम अशी पर्यायी व्यवस्था नसेल तर दुबार पेरणीचे संकट उद्भवू शकते. एकंदरीत या वर्षासाठी मान्सुन आव्हानात्मक राहाणार आहे यात शंका नाही, असे ही उत्तम निर्मळ यांनी सांगितले.

# रस्त्याच्या वादातून सहा जणांविरुद्ध मारहाण व धमकीचा गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : रस्त्याच्या वापरावरून झालेल्या वादातून एका कुटुंबाला शिवीगाळ, मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वाती शरद तोडमल (वय ३२, रा. तोडमल वस्ती, लोहगाव ता. नेवासा, जि. अहमदनगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना (दि.६ ) जून २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ४.३० वाजता फिर्यादीच्या घरासमोर घडली.




या प्रकरणी राहुल नंदकुमार तोडमल, गणेश नंदकुमार तोडमल, रंजना नंदकुमार तोडमल, गीता गणेश तोडमल, नंदकुमार सूर्यभान तोडमल व सोनाली राहुल तोडमल (सर्व रा. तोडमल वस्ती, लोहगाव , ता. नेवासा) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. फिर्यादी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी फिर्यादीच्या घराशेजारील रस्त्यावर नागरणी सुरु केली तसेच रस्त्यावरून जाण्यास विरोध करत वाद घातला.

यावेळी शिवीगाळ करून लाकडी काठी व लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. फिर्यादीच्या नातेवाईकांनी भांडण सोडविण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही मारहाण करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

तसेच आरोपींनी पुन्हा या रस्त्यावर आढळल्यास ट्रॅक्टरखाली चिरडून जीवे मारू, अशी धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकरणी विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोनई पोलीस ठाण्याचे पोलीस सपोनि अनिल मोरे यांच्या मार्गदर्शना खाली पुढील तपास सफो.आर. एस. पवार करीत आहेत.

# आमदारानींच पकडून दिला अवैध दारू अड्डा



### उत्पादन शुल्क विभागाची अकार्यक्षमता आली चव्हाट्यावर

आमदार डॉ. लहामटे यांनीच निंब्रळ येथील अवैध दारू विक्रीचा धंदा उघडकीस आणला असून अकोले पोलिस व उत्पादन शुल्क विभागाची अकार्यक्षमता पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली.त्यामुळे दोन्ही विभागाचे नेमके आहे तरी,काय काम?असा सवाल उपस्थित केला जात आहेत.

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अकोले / झरेकाठी** : अकोले तालुक्यातील मतदारसंघात दौऱ्यावर असलेल्या आमदार डॉ. किरण लहामटे यांना निळवंडे धरण विश्रामगृह रस्त्यालगत एका टेकडीवर संशयास्पद गर्दी दिसली. गाडी थांबवत मोडकळीस आलेल्या त्या घराकडे आमदार लहामटे पायी एकटेच निघाले.

आमदार दिसताच तेथील चार-दहा जणांनी पोबारा केला. आमदार त्या घरात पोहोचले असता,चक्क देशी दारूच्या बाटल्या आढळून आल्या असा धक्कादायक प्रकार प्रत्यक्षात दिसला होता. शुक्रवारी सायंकाळी एका खासगी सहायकाबरोबर दौऱ्यावर असताना आमदारांना त्या घरात अवैधरीत्या दारू विक्री होत असल्याचे आढळून आले. एका सॅकमध्ये काही भरलेल्या देशी दारूच्या बाटल्या होत्या.

घराच्या पाठीमागे रिकाम्या देशी दारू बाटल्यांचा खच व गोण्या भरलेल्या दिसल्या. अकोले पोलिसांना फोन करण्यात आला तेथे एक मोबाइल फोनचे स्कॅनर होते. ते ताब्यात घेतले, एका दुचाकीची हवा सोडली. आमदार यांनीच निंब्रळ येथील अवैध दारू विक्रीचा उघडकीस आणल्याने अकोले पोलिस व उत्पादन शुल्क विभागाची अकार्यक्षमता पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे. आमदार यांनी पोलिस स्टेशन गाठत संबंधित अवैध दारू विक्री करणाऱ्यावर व तेथील जागा मालक, बीट अंमलदार यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

त्यावेळी पोलिस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.दारू सह मुद्देमाल ताब्यात घेतला.तसेच अवैधरीत्या दारू विक्री करणारा सुरेश अरुण गायकवाड (रा. मेहेंदुरी) यास ताब्यात घेतले व कारवाई सुरू असल्याचे सांगितले.

# पिंप्री-लौकीत वीजेच्या लपंडावामुळे पिके जळण्याच्या मार्गावर!

## सरपंच आणि उपसरपंच आंदोलनाच्या पवित्र्यात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील पिंप्री-लौकी अजमपुर गावातील शेतकरी गेल्या एका महिन्यापासून सततच्या वीजेच्या लपंडावामुळे त्रस्त झाले आहेत.

शेतीपंपाचा वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने उभी पिकें जळण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे वीजपुरवठा त्वरित सुरळीत करण्यात यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सरपंच सौ. संगीता गीते आणि उपसरपंच बाजीराव गीते यांनी दिला आहे. गावातील शेतकऱ्यांना पूर्वी आठ तास पूर्ण दाबाने वीजपुरवठा केला जात होता. मात्र, गेल्या दीड-दोन महिन्यांपासून आठ तासांऐवजी केवळ सहा तास वीज मिळत आहे. त्यातही सतत



खंडित होणारा वीजपुरवठा आणि कमी दाबाने होणारी वीजपुरवठा यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीपंपाचे व ट्रान्सफॉर्मरचे वारंवार नुकसान होत आहे.

या भीषण उन्हाळ्यात पाणी वेळेवर न मिळाल्यामुळे चारा पिकांसह इतर पिके जळून जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. खळी येथून पिंप्री-लौकीला होणारा वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी नवीन ट्रान्सफॉर्मर बसवण्याची मागणी पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली जाणार आहे.

तसेच, महावितरणचे वरिष्ठ अधिकारी आणि ऊर्जामंत्री यांनाही याबाबत सविस्तर निवेदन पाठवले जाणार आहे. दरम्यान, महावितरण प्रशासनाने तातडीने वीज पुरवठा सुरळीत करावा, अन्यथा आम्हाला आंदोलन करावे लागेल, असा इशारा सरपंच आणि उपसरपंचांनी दिला आहे.